गणेशकवीकृत

Jatakalankara

जातकालंकार.

हरभानुकृत टीका

व मराठी भाषांतर यां सहित.

हें पुस्तक

वेदशास्त्रसंपन्न रा॰ रा॰ अनंतशास्त्री साठे काशीकर ज्योतिषी.

यांजकडून भाषांतर करवून

भास्कर नारायण गोडबोले

यांनीं

आपले ' वृत्तप्रसारक ' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

पुणें पेठ सदाशिव.

आवृत्ति २ री.

तारीख १६ माहे दिसेंबर १८९४

किंमत १२ आणे.

प्रस्तावना.

उद्यमेनैवसिद्ध्यंतिकार्याणिनमनोरथैः ॥
नहिसुप्तमृगेंद्रस्यानिपतंतिमुखेगजाः ॥ १ ॥

पुराकिलास्मिन्नार्यावर्ते बहवो ज्योतिःशास्त्रवेत्तारोऽभूवन् । तैःखलुभूरिशः स्वानुभूत्योपपत्यानेकाः ग्रंथाः प्रादुराविष्कृताः । तैस्ते निबंधाः स्वबुध्याऽल्पमेधावीनां उपयोगार्थमेव सुलभाः निबद्धाः । तथाप्याधुनिकबुद्धिमद्भिः तान्क्लिष्टकारित्व दोषांकितान् कृत्वा स्व स्व देशभाषयाउपयोगार्थ मानीताः । परंच यथा गीर्वाणभाषया निबंधो न्यायघटितो व्याख्यायते तथा देशभारत्या नैव व्याख्यातुं समर्थो भवति तथापि ग्रंथतात्पर्यमेव उपयोगकारिभूत मितिबुध्वा व्याख्येरन् । तथैव मयाप्यस्मिन् विषये स्वानुभूत्योपपत्यैव यथा तथा व्याख्या विस्तारिता । अत्र यच्चापल्यं किमपि तद्बुधाः क्षमध्वं ।

अस्मिन् विषये किमपिये सहायीभूतास्तेषां नाम प्राकाश्यं विनामम नैव मनोविनोदःस्यात् । अतएव कटक्करोपाव्हय नारायण सूनुना वासुदेव रायेण समयसूचकानु भवरूपो महानुपयोगोऽस्य लेखनविषय श्रमेण स्वानुकूल्य तया अयमुद्योगः परिपूर्तिमगात्.

साठे त्युपाव्हय रंगनाथसूनुः
अनंतशर्मा कश्चित्.

यथाचार्य व्ययो भूयात् तथाकार्यंहि सिद्ध्यति ॥
यथाक्षीरेखंड योग स्तथामिष्ट तरं खलु ॥ १ ॥

आजपर्यंत ज्योतिःशास्त्रावर अनेक ग्रंथ झाले आहेत. तथापि याविषयाची महती अद्यापि कोणासही ज्या मानानें वाटावी त्या मानानें आमच्या समाजाला वाटूं लागली नाहीं. व ती न वाटणें हें ही स्वाभाविकच आहे, कारण प्राकृतांत या ग्रंथांचीं भाषांतरें ही कचितच झालीं आहेत.

यद्यपि ज्योतिःशास्त्र ह्मणजे सामान्यतः नक्षत्रें व ग्रह यांच्या संमेलनाच्या परिणामापासून होणारें ज्ञान असा लोकांचा (ज्योतिःशास्त्रांत प्रवेशकांचा) समज आहे, तथापि हा विषय अत्यंत गदन आहे.

ह्या विषय शिकतानां याचे तीन स्कंध (भाग) दृष्टीस पडतात. एक गणित, दुसरा जातक, तिसरा संहिता.

गणितावरून जो कांहीं स्वस्थपदार्थांचा बोध होतो तो गणितस्कंध, व ज्या स्वस्थपदार्थबोधापासून होणारें जें परिणामरूप त्यांचें ज्ञान तें फलित, त्यास जातकस्कंद असें ह्मणतात. आणि या दोहोंच्या ज्ञानापासून ज्या अनेकविध नवीन कल्पना रचून लोकांस प्रत्यक्ष फलास आणून त्यापासून सूपयोग करून घेणें याचें नांव संहितास्कंध.

प्रत्येक भागांतील वरील उदाहरणार्थ कांहींशी संस्कृत ग्रंथांची माहिती देतों.—सूर्यसिद्धांत दोनप्रकारचे व शिरोमणिसिद्धांत आणि आर्यसिद्धांत असे दोन प्रकारचे इत्यादि गणितस्कंध. शंभुहोरा १ बृहत्पाराशरी १ हायनरत्न वगैरे जातकस्कंध. २ वसिष्ठसंहिता १ बृहत्संहिता इत्यादि संहिता स्कंध ३ असे अनेक ग्रंथ संस्कृत भाषेंत झाले आहेत. व त्यांतही वरील भागांच्या माहिती पूर्णपणें आहेत.

या गोष्टीचा प्राकृतांत कांहीं तरी उपयोग फळापुर्ता घडावा म्हणून व ही लोकसेवा आपल्या हातून अल्पस्वल्प बुद्धीनें व्हावी यासाठीं प्रस्तुत " जातकालंकार नामक " ग्रंथाचें भाषांतर केलें आहे.

या पुस्तकाचें समग्र भाषांतर वाचून झाल्यावर श्लोकाखालीं दिलेल्या टीकेप्रमाणें भाषांतर विशेष विस्तृत नाहीं ही शंका वाचकांच्या मनांत येईल, व ती येणेंही साहजिकच आहे. तथापि त्या शंकेचें निरसन थोडक्यांत होण्यासारखें आहे तें असें कीं, दुसऱ्या अध्यायांतीचे दुसऱ्या श्लोकांतील " देहाधीशःसपापोव्ययरिपुमृतिगःश्चेत्तदादेहसौख्यं ।। नस्याज्जंतोर्निजर्क्षेव्ययरिपुमृतिपस्तत्फलस्यैवकर्ता ॥ " या दोन चरणाचा अर्थ करतानां निजर्क्षे या पदाचा अर्थ टीकाकारांनीं " योगानामचिंत्यफलत्वात् " ह्या न्यायरीत्या जो अर्थ दिला आहे तो अन्याचार्य मतानें व अनुभवानें दोषाचे अनन्यगतिक न्यायानें समाधान केलें; याप्रमाणेंच टीकेमध्यें दिलेल्या अर्थांत व अनुभवांत विरोध व बऱ्याच ठिकाणीं मतभेद पडतो, म्हणून भाषांतर करतानां टीका विस्ताराकडे लक्ष न देतां अनुभवाकडेच विशेष लक्ष दिलें आहे.

दुसरी गोष्ट अशी कीं, या ग्रंथांत सांकेतिक (पारिभाषिक) शब्दांची उणीव आहे ती दूर होण्याकरितां ग्रंथाचे अखेरीस तीन कोष्टकें पृथक् दिलीं आहेत. या शिवाय वेळोवेळीं निराळीं ग्रंथांत सांकेतिक शब्दांचीं कोष्टकें दिलीं आहेत. आणि याशिवाय ही जन्मपत्रिकेंत जन्मकालीन इष्टकाल समयीं ग्रहस्पष्ट, द्वादशभाव व त्यांची क्षय व चय (आरोहावरोहाचेविस्ते), दशा ग्रहांच्या, आणि अवस्थाकाल व बलें हीं अन्य ग्रंथांतून घेणें त्याशिवाय इलाज नाहीं. येथें सविस्तर सांगणें होत नाहीं हें स्पष्टच आहे.

तात्पर्य.—भाषांतर करतानां ज्या ठिकाणीं तेवढ्यानेंच चांगला बोध होणार नाहीं असें वाटलें त्या ठिकाणीं खालीं वेगळें तात्पर्य देऊन जास्त स्पष्टी करण केलें आहे. कोठें अन्य ग्रंथांतील सूचनार्थ टीप म्हणून खालीं दिली आहे.

अनंतशर्मा.

ग्रंथाच्या शेवटीं दिलीं आहेत.

सर्व कोष्टकांच्या सूचना.

या ग्रंथाचें भाषांतर करताना पारिभाषिक शब्दांची जी उणीव दिसली त्याचे निवारणार्थ हीं कोष्टकें दिलीं आहेत. ज्या मनुष्यास सामान्यतरी नुसती कुंडली पाहाण्याचें ज्ञान नाहीं त्यास या ग्रंथाचा उपयोग फार कमी होईल, याचें कारण हें शास्त्र अनुभविक व काल्पनिक आहे व सांकेतिक शब्द हे थोडेसे तरी माहित पाहिजेत ह्मणून या कोष्टकांतून प्रत्येक स्थळीं असें पाहावें कीं, उदाहरणार्थ.—एक मेष राशी याप्रमाणें एक रविग्रह या दोहों खालीं लिहिलेलें जें विशेष तें त्या गोष्टीचे कारक ह्मणजे या जगतांत त्या गोष्टीचे ग्रह, राशींचा आकर्षण बलाबलानें कारक तेच आहेत. करितां प्रत्येक स्थळीं सामान्यतः ग्रह आणि राशी यांचें तत्वज्ञान मुख्यत्वें करून ज्योतिःशास्त्रानुभवेच्छु मनुष्यास पाहिजे.

तसेंच ज्योतिःशास्त्रांतील सर्व भागांत फलादेश पाहाण्याचें व पारिभाषिक शाब्दिक नियमाचें आणि बलाबल विवेकाचे नियम सर्वत्र सारिखेच आहेत. किंचित् मतभेद आहे; परंतु जसे द्वादश भावापैकीं जो भाव आपले अधिपतीनें (राशिस्वामीनें) युक्त किंवा दृष्ट असून, १ अन्य शुभ ग्रहानीं दृष्ट किंवा युक्त असून २ आणि कारक ग्रहाचा योग दृष्टि नवांशादि संबंध असल्यास ३ त्या भावाची, या तीन योगांवरून पूर्णपणें - वृद्धि सांगावी. यापैकीं कांहीं न्यून योग असल्यास त्या भावाची वृद्धि कमी असें प्रत्येकस्थळीं तसेच चंद्र कुंडली (राशीकुंडली) वरून ही योग सर्वत्र सामान्य फलादेशरूप जाणून या ग्रंथाचा उपयोग करावा.

बलाबलज्ञानाकरितां षड्वर्गी कोष्टकें दिलीं आहेत. येथें जितके स्वीयाधिकार येतील तितके पूर्ण बलाबलाला घ्यावे. क्वचित् शुभग्रहाचे किंवा मित्र ग्रहाचे घेण्याविषयीं नियम आढळतात. परंतु ते नियम प्रामाणिक बहुऋषि संमत नव्हेत. तसेच अन्य ग्रंथांत षोडशांश, षष्ठ्यंश इत्यादिक बलें लिहिलीं आहेत परंतु सामान्यतः इतका इष्टकाल सूक्ष्म आणि ग्रहांची वेधतः स्पष्टीकरणशुद्धि अनुकूल प्रत्यक्ष प्रमाणानें निर्विवाद होऊन मग शष्ठ्यंशादि विवेकाकडे लक्ष देणें, नाहीं पेक्षां स्थूल चालू आहे हें बरें असें समजून फलादेश पहावा कारण हल्लीं आपले लोकांस इतका विचार करण्यास काल जो ईश्वर त्याची अनुकूल्यता नाहीं तथापि १० फलांपैकीं आपल्या मतानें सात फलें तरी अद्यापि निर्विवाद अनुभवास येतात. सर्व मायाजालांत खरें काय आहे? यावत् तावत् (अ. ब. क.) कल्पनानीं फलानुमान करणें आहे. वाऱ्याची मोट बांधणें आहे, ज्योतिषी ह्मणजे फलादेशांत पक्का चतुर असेल तोच जाणावा.

यथामति केलेले श्रम सफल होवोत.

ग्रंथाकार.

श्रीः

अथ जातकालंकार प्रारंभः

संज्ञाध्यायः १.

मंगलाचरण.

श्लोक. (शार्दूलविक्रीडित.)

सानंदंप्रणिपत्यसिद्धिसदनंलंबोदरंभारतीं ॥
सूर्यादिग्रहमंडलंनिजगुरुंभक्त्याहृदब्जेस्थितम् ॥
येषामंघ्रिसरोरुहस्मरणतोनानाविधाःसिद्धयः ॥
सिद्धिंयांतिलघुप्रयांतिविलयंप्रत्यूहशैलव्रजाः ॥ १ ॥
सद्भावाकलितंपदार्थललितंयोगांगलीलार्चितं ॥
श्रीमद्भागवतंशुकास्यगलितंयच्छ्रीधरस्वामिना ॥
सुव्यक्तंक्रियतेगणेशकविनागाथोक्तिजातकं ॥
वृत्तस्रग्धरयाजनादिसुफलंज्योतिर्विदांजीवनम् ॥ २ ॥

टीका.—श्रीगणेशायनमः ॥ * वस्वर्णब्रम्हविद्यापरिचयचतुरंश्रीशुकंव्यासपुत्रं नत्वाचार्यमुनीनांहरिपदकमलेप्रेमविश्रांमभाजां ॥ स्विष्टेष्टंस्वेष्टदेवंश्रुतिसमधिगतंमाधवं भावयित्वाभावैरुद्भाव्यतेऽस्मैप्रवरमतिमुदेजातकालंकृतश्रीः ॥ १ ॥ अथज्योतिर्वित्तिलकः छंदोलंकृतिकाव्यरचना निपुणःश्रीगणेशकविःश्रीशुकजातकानुरोधिजातकालंकारनामकग्रंथंचिकीर्षुस्तदादौनिर्विघ्नपरिसमाप्त्यर्थंशिष्टाचारक्रमगतंभगवद्विभूतिभूतगुरुगणेशभारतीकर्मप्रणिपातपरंविष्णुनिर्देशात्मकंमंगलमाचरतिद्वाभ्यांशार्दूलविक्रीडिताभ्यां । सानंदमिति । सद्भावाकलितमिति । गणेशकृतिनागणेशनाम्नाग्रंथकरणकुशलेनमयातज्जातकंवृत्तस्रग्धरयाप्रव्यक्तंक्रियतेस्पष्टार्थंयथास्यात्तथाविधीयतइत्यर्थः किंकृत्वाभक्त्यातांन्सिद्धिसदनान्नत्वानमस्कृत्य । तान् किंविधान् येषामंघ्रिसरोरुहस्मरणतः नानाविधाःअनेकविधाःसिद्धयःकार्यसिद्धयःसिद्धिंपूर्णतांयांति प्रत्यूहशैलव्रजाः वि-

---

* ॐ नमो नारायण.

अपर्वतसमूहाः विघ्नोंतरायः प्रत्यूहइत्यमरः व्रजोगोष्ठाध्ववृंदेषुइत्यमरः लघुशीघ्रंविलयं यांतिनश्यंति लघुक्षिप्रमरंद्रुतमित्यमरः लध्विति पदंशीघ्रता वाचकं देहलीदीपकन्याये नोभयत्रान्वेति। तान्कान् तदाह सिद्धिसदनं सिद्धिर्लक्ष्मीः तस्याः सदनंगृहंनिवास स्थानमितियावत् श्रीनिवासमित्यर्थः त्वंसिद्धिस्त्वं स्वधास्वाहेत्यादि लक्ष्मीस्तुत्यारंभे सिद्धिशब्दस्य लक्ष्म्यां प्रयुक्तत्वात् सिद्धिर्लक्ष्मीरिति नित्यविकल्पोर्थः कीदृशंसि द्धिसदनंसानंदं आनंदेनसहितं ब्रह्मणआनंदः आनंदं ब्रह्मणोविद्वानितिश्रुतेः सानं दमितिविशेषणपदंभगवतोऽन्यत्रनोपपद्यते ततोन्यदार्त्तमिति श्रुत्वाब्रह्माणमित्यत्रार्तवो पदेशात् हृदब्जेस्थितंहृदयकमलवासिनं सर्वस्यचाहंहृदिसन्निविष्टइतिभगवद्वचनात् भक्त्याप्रीतिपूर्वकानुस्मृत्या गुरुंश्रीमच्छिवाख्यंलंबोदरंविनायकं भारतीं सरस्वतीं सूर्यादिग्रहमंडलं रव्यादीनांग्रहाणांमंडलंसमूहंच प्रणिपत्यनमस्कृत्य शुकास्यागलितं शुकमुनिमुखादुक्तिभूतं गलितंगाथोक्ति गाथानांश्लोकविधुरांगिरांउक्तिव्यवहारः यस्मि न् तथाभूतंकथव्यक्तंक्रियते यथाशुकास्याद्गलितं श्रीमद्भागवतं महापुराणं श्रीधरस्वा मिनाव्यक्तंकृतमित्यध्याहारः कथंभूतंभागवत जातकंच सद्भावाकलितंसत् प्रशस्तो भावोविष्णुभक्तिः तेनाकलितंविशिष्टं जातकपक्षेसद्भावैस्तन्वादिद्वादशभावैस्तात्पर्यो र्वाविशिष्टं पदार्थललितंपदार्थैः परमभक्त्युद्योतकैः श्रवणकीर्तनादिभिः ललितं रुचिरं जातकपक्षेपदार्थैः सानंदसदनादिभिर्मनोहरं योगांगलीलार्चितंयोगोभक्तियोगस्तस्यां गानियमासनप्राणायामध्यानधारणसमाधयः तेषांलीलाउपदेशविशेषास्ताभिरर्चितं सहितंजातकपक्षेयोगांगानि, ग्रहभावादीनि तेषांलीलायोग्यत्वेनघटनविशेषास्ताभिः सहितंप्रशस्त मित्यर्थः ज्योतिर्विदांजीवनंज्योतिः परमात्मानारायणः परोज्योतिरिति श्रुतेः तद्विदांब्रह्मविदांजीवनंकालक्षेपयोग्यं जातकपक्षे ज्योतिर्विदांगणकानांजीविका प्रदत्वाज्जीवनमित्यर्थः वृत्तस्रग्धरयास्रग्धरावृत्तैरित्यर्थः जात्यभिप्रायेणैक वचनोक्तिः तस्यलक्ष्यलक्षणं चत्वारोयत्रवर्णाः प्रथममित्यादि ॥ १ ॥ २ ॥

अर्थ.—ज्यांचे चरणकमलाचे स्मरणापासून नानाप्रकारचे कार्यारंभ सिद्धीस जातात. व मोठमोठीं विघ्नें दूर होतात असे विष्णु, गणपति, सरस्वती व सूर्यादिनवग्रह व स्वगुरु ह्यांस स्वकीय हृत्कमलाचे ठायीं भक्तीनें आनंद पुरस्सर नमस्कार करून द्वादश भावांनीं युक्त, उत्तमपदांनीं शोभायमान, ग्रहयोगांनीं पूजित याप्रकारें शुकमुखांतून निघालेलें जें गाथोक्ति जातक जन्मापासून सर्व फळांतें दर्शक ज्योतिषी लोकांस जीवनोपाय असें गणेश-कवि मी स्रग्धरा वृत्तानें स्पष्ट करतों, तसेच उत्तम भाविक भक्तीनें पदार्थ वर्णनानीं शोभायमान, अष्टांगयाग वर्णन युक्त शुकमुखांतून निघालेलें जें श्रीमद्भागवत ब्रह्मवेत्ते लोकांस करमणूक, चतुर्दशभुवनांतील लोकांस मान्य असें श्रीधरस्वामीनीं स्पष्ट केलें आहे. १, २.

ग्रंथप्रयोजन. (शार्दूलविक्रीडित.)

यत्पूर्वंपरमंशुकास्यगलितंसज्जातकंफक्किका ॥
रूपंगूढतमंतदेवविशदंकुर्वेगणेशोऽस्म्यहम् ॥

दैवज्ञःसुतरांयशःसुखमतिःश्रीहर्षदंस्रग्धरा ॥
वृत्तैश्चारुनृणांशुभायनपदंश्रीमच्छिवानुज्ञया ॥ ३ ॥

टीका—ननुश्रीधरस्वामिवद्भवतापिशुक जातक व्याख्याने कर्तव्य ग्रंथारंभोनोचितस्तत्राह यत्पूर्वमिति गणेशनामाहंश्रीमच्छिवानुज्ञया वेदशास्त्रसंपन्नशिवनाम्नः गुरोराज्ञया तत्प्रीत्यर्थमितिभावः पूर्वभवकाले शुकास्यगलितं छंदोरहितत्वात्फक्किकारूपंगूडतमं अतिशयेन गहनं नतुविशदं परमंसारार्थनिरूपणेनोत्कृष्टं यज्जातकं तदेव स्रग्धरावृत्तैश्चारुरुचिरंविशदंकुर्वेफक्किकारूपस्यगूढतमस्यविशदीकरणंश्लोकैरेवोचितमिस्याशयः कथंभूतोगणेशः दैवज्ञोऽदृष्टवेत्ताकर्तव्यग्रंथभावितवार्तादर्शीनिगूढभावः सुतरांयशः सुखमतिः अतिशयितकीर्तिजन्यसुखेमतिर्यस्यसः प्रयोजनगर्भमिदंविशेषणं यशोऽन्यसुखार्थमितिभावः कीदृशंतत् श्रीहर्षदंश्रियंहर्षंच ददातितत् शुभायनपदं शुभायनानांशुभजातकानां आनंदसिद्धि सदनादीनां आस्पदं स्थानं ३

अर्थ.—श्रीमान् शिवनामक गुरूच्या आज्ञेनें जें पूर्वकालीं उत्कृष्टजातक शुकमुखांतून फक्किका रूपानें अतिक्लिष्ट निघालेलें तें गणेशदैवज्ञ मी सर्व सारांशरूपानें ज्योतिषी लोकांस यश, सुख, बुद्धि लक्ष्मी व हर्षातें देणारें स्रग्धरावृत्तेंकरून उत्तम सुंदर असें जें उत्कृष्ट आणि सर्व लोकांस यश, सुख, बुद्धि, लक्ष्मी व हर्षातें देणारें स्पष्ट वर्णन करितों.

ग्रंथस्वरूप (स्रग्धरा)

भूयांसःसंतिभूमौनिजपरमधियाशालिनःकाव्यगुंफे ॥
संख्यावंतस्तथापिप्रचुरपरगुणानंदलीलांभजंते ॥
चंचद्गांभीर्यपद्माविबुधविटपिनांजन्मसंप्राप्तिनूनं ॥
मर्यादांनस्वकीयांत्यजतिकिलमहान्रत्नधामासरस्वान् ४

टीका—ननुसत्कवीनांहर्षप्रदं त्वदीयंजातकंनस्यादित्याह । भूयांसइति । भूमौयद्यपिकाव्यगुंफे गद्यपद्यरचनायांनिजमतिरचनाशालिनः निजधिया या काव्यरचना तयाशालंते तेभूयांसः निपुणाः संख्यावंतः कवयः संति तथापिप्रचुरपरगुणानंदलीलांभजंते प्रकृष्टपरगुणानुभवजन्यानंदलीलांउद्वहंति नोपेक्षंतइत्यर्थः परगुणपरमाणून्पर्वतीकृत्यनित्यंनिजहृदिविकसंतः संतिसंतः कियंत इत्युक्तत्वात्कृत्यानुपरगुणानुभवजन्यप्रमोद एव तेषांलीलेतिभावः । उक्तमर्थमर्थांतरन्यासेनद्रढयति चंचद्गांभीर्यचपद्माचविबुधविटपीचचंचद्गांभीर्यपद्माविबुधविटपिनः चंचंतोद्योतमानाः गांभीर्यादयश्च एतेषांजन्मसंप्राप्तिः आश्रयोऽपिरत्नधामापिरत्नगृहमपि सरस्वान् समुद्रः स्वकीयांमर्यादास्थितिं न त्यजति तथैव कवयोऽपि प्रमोदे रत्नेतिभावः गांभीर्यं निश्चलता पद्मा लक्ष्मीः विबुधविटपी पारिजातः अत्ररत्नधामेतिपदंचित्यं धामशब्दस्यनपुंसकलिंगत्वात्


अत्र तत्पुरुषसमासेपरवल्लिंगंद्वंद्वतत्पुरुषयोरित्यनुशासनेन रत्नधामेतिनपुंसकांतत्वस्या- दंतत्वात् अतोरत्नधामाप्युदन्वानितिपाठः समीचीनः ॥ ४ ॥

अर्थ.—भूमंडलाचे ठायीं काव्य रचनेविषयीं स्वबुद्धीच्या उत्कृष्टतेनें शोभायमान असं- ख्यात् कवी आहेत तथापि ते उत्कृष्ट रचित कवितेतें पाहून आनंद पावतात. जसा अत्यंत धैर्य, लक्ष्मी व कल्पवृक्ष यांच्या जन्माची भूमी सर्व रत्नाची खाण असा समुद्र आपल्या मर्यादेचें उल्लंघन करीत नाहीं. तसेच सत्कवि या ग्रंथास पाहून आनंद पावतील.

लग्नादिकांच्या संज्ञा.

देहंद्रव्यपराक्रमौसुखसुतौशत्रुःकलत्रंमृतिः ॥
भाग्यंराज्यपदंक्रमेणगदितालाभव्ययौलग्नतः ॥
भावाद्वादशतत्रसौख्यशरणंदेहंमतंदेहिनां ॥
तस्मादेवशुभाशुभाख्यफलजःकार्योबुधैर्निर्णयः ॥ ५ ॥

टीका—अथतन्वादीनांसामान्यविशेषसंज्ञाः कथयते यावदध्यायं। आदौतावल्लग्ना दीनांदेहादिसंज्ञाः तेषांसर्वेषांभावसंज्ञांचशार्दूलविक्रीडितेनाह । देहं द्रव्यपराक्रमावि- ति । लग्नतः ल्यपूलोपेपंचमी लग्नमारभ्यक्रमेणदेहादयोद्वादशभावाः गदिताः उक्तास्त त्रलग्नंदेहोदेहभावः द्वितीय तृतीयौद्रव्यपराक्रमौ द्रव्यपराक्रमभावौ चतुर्थपंचमौभावौ सुख सुतौ षष्ठः शत्रुः सप्तमभावः कलत्रं अष्टमोमृतिः नवमोभाग्यं दशमं राज्यपदं एका- दशद्वादशौ लाभव्ययौलाभव्ययनामकौ तत्रतेषुदेहिनांदेहं सौख्यंशरणंसुखाश्रयंमतं अतोबुधैः ज्योतिर्विद्भिस्तस्माद्देहादेवलग्नभावादेवशुभाशुभाख्यफलजोनिर्णयोवक्ष्य- माणप्रकारेण कार्यः ५



देह भावापासून तों व्यय भावापर्यंत द्वादशभाव त्यांत देह हेंच सौख्याचें घर असले कारणानें ज्योतिषवेत्त्यांनीं शुभाशुभ फलांविषयीं यावरूनच नि- र्णय करावा.




भावसंज्ञा.

लग्नंमूर्तिस्तथांगंतनुरुदयवपुःकल्पमाद्यंततःस्वं ॥

कोशार्थाख्यंकुटुंबंधनमथसहजंभ्रातृदुश्चिक्यसंज्ञं ॥
अंबापातालतुर्यंहिबुकगृहसुहृद्वाहनंयानसंज्ञं ॥
बंध्वाख्यंचांबुनीरंजलमथतनयंबुद्धिविद्यात्मजाख्यं ॥६॥
वाक्स्थानंपंचमंस्यात्तनुजमथरिपुद्वेषवैरिक्षताख्यं ॥
षष्ठंजामित्रमस्तंस्मरमदनमद्यूनकामाभिधानं ॥
रंध्रायुश्छिद्रयाम्यंनिधनलयपदंचाष्टमंमृत्युरन्यत् ॥
गुर्वाख्यंधर्मसंज्ञंनवममिहशुभंस्यात्तपोमार्गसंज्ञं ॥ ७ ॥
ताताज्ञामानकर्मास्पदगगननभोव्योममेषूरणाख्यं ॥
मध्यंव्यापारमूचुर्दशममथभवंचागमंप्राप्तिमायं ॥
इत्थंप्रांत्यांतिमाख्यंमुनयइहततोद्वादशंरिःफमाहुः ॥
ग्राह्यंबुध्वाप्रवीणैर्यदधिकममुतःसंज्ञयातस्यतच्च ॥ ८ ॥

टीका.—लग्न मिति। लग्नं मूर्त्यादिशब्दवाच्यमितिमुनयः ऊचुरिति तृतीयेनान्वयः मूर्तिः अंगतनुरुदयवपुः कल्पमितिसमाहारः उदयः वपुःकल्पमाद्यंतन्वादयो लग्नपर्यायाः इतिप्रथमभावः १ ततोऽनंतरं धनं स्वंकोशार्थाख्यंकोशश्चार्थश्चकोशार्थौ आख्या यस्यसतथातंधनंस्वादिसंज्ञमूचुरित्यन्वयः अयमग्रेपि २ सहजंभ्रातृदुश्चिक्यसंज्ञंतृतीय भावः ३ अंबापातालतुर्यंहिबुकगृहसुहृद्वाहनं यानसंज्ञंयाननामकं एवंबंध्वाख्यं बंधुसंज्ञंअंबुनीरं जलं एतेचतुर्थभावस्यपर्यायाइतिभावः ४ अथतनयं बुद्धिविद्यात्मजाख्यं वाक्स्थानंपंचममित्यग्रिमेणसंबंधः स्यात् पंचमभावस्यैतेपर्यायाः ॥ ६ ॥ वाक्स्थानमिति ५ अथषष्ठंरिपुद्वेषवैरि क्षताख्यंऊचुः रिपुद्वेषवैरिक्षतनामक मित्यर्थः ६ अथ सप्तमं जामित्रमस्तंस्मरमदनमद्यूनकामाभिधानंऊचुः सप्तमंजामित्रास्तस्मरमदनादिनामकमित्यर्थः ७ अथाष्टमंरंध्रायुश्छिद्रयाम्यंनिधनलयपदंमृत्युं अष्टमं रंध्रादिनामक मित्यूचुः ८ अतोऽन्यन्नवममिहशास्त्रेगुर्वाख्यंधर्मसंज्ञंशुभतपोमार्गसंज्ञंऊचुः ९ ॥ ७ ॥ तातेति अथतनोर्दशमंतातादिनामकमूचुरिति आज्ञामानंकर्मआस्पदंगगनंनभोव्योममेषूरणंमध्यमं व्यापारमूचुरितिस्फुटाव्यक्तिः १० अथभवं एकादशंआगमं प्राप्तिंआयमूचुः ११ इत्थमुक्तं ततोद्वादशंप्रांत्यांतिमाख्यं प्रांत्यनामकं अंतिमंरिःफंचाहुः १२ यदमुतः प्रोक्तात्पर्यायसमुदायात् अधिकं दृश्येत् तस्यतस्ययन्नामोक्तं नामसंज्ञायांपर्यायंबुध्वात त्तुल्यार्थंशुद्धंग्राह्यंयथावित्तशब्देनतुल्यार्थेधनं सहोत्थेनसहजभावोग्राह्यः प्रवीणैरिति ॥८




याप्रमाणें तनुभवनापासून ते व्ययभवनापर्यंत या शास्त्रांत ऋषींनीं संज्ञा सांगितल्या याशिवाय निपुण लोकांनीं लग्नादि द्वादशभावापर्यंत पर्याय शब्द जाणून ततुल्यार्थ आणखी नावें घ्यावीं.

केंद्रादिसंज्ञा.

आद्यंतुर्यंकलत्रंदशममिहबुधैःकेंद्रमुक्तंत्रिकोणं ॥
पुत्रंधर्माख्यमुक्तंपणफरमुदितंमृत्युलाभात्मजार्थं ॥
धर्मंचापोक्लिमाख्यंव्ययरिपुसहजंकंटकाख्यांहिकेंद्रं ॥
चैतच्चातुष्टयंस्यात्त्रिकमिहगादितंवैरिरिःफांतकाख्यं॥ ९ ॥

टीका–आद्यमिति इहशास्त्रेबुधैः आद्यं चतुर्थं सप्तमं दशमं केंद्रमुक्तंपरतः कंटकाख्यं चतुर्थंचस्यात् चतुष्टयमेवचातुष्टयं पंचमं नवमं त्रिकोणमुक्तं मृत्युलाभात्मजार्थं अष्टममेकादशं पंचमं द्वितीयं पणफरमुक्तं नवमं द्वादशं षष्ठं सहजं आपोक्लिमसंज्ञंउदितंवैरिरिःफाष्ट माख्यषष्ठ द्वादशाष्टमांत्रिकमुक्तम् ॥ ९ ॥



+ केंद्र, पणफर, आपोक्लिम, त्रिकोण हीं शुभस्थानें. त्रिकस्थानें अशुभ.

ग्रहांचें मित्रशत्रुत्व. (शार्दूलविक्रीडित)

चंद्रेज्यक्षितिजारवींदुतनयोगुर्विंदुसूर्याःक्रमात्
शुक्रार्कौरविचंद्रभूमितनयाज्ञार्कीसितज्ञौमताः ॥
अर्कादेःसुहृदःसमाअथबुधःसर्वेहिशुक्रार्कजौ ॥
भौमाचार्ययमायमःकुजगुरूपूज्यःपरेवैरिणाः ॥ १० ॥

टीका—अथमित्रशत्रूनेकेन शार्दूलविक्रीडितेनाह चंद्रेति चंद्रेज्यक्षितिजादयः अर्कादेः सुहृदः बुधादयः समाः अन्येवैरिणः मताः मुनिभिरितिशेषः सूर्यस्यचंद्रेज्यक्षितिजाः सुहृदः मित्राणि बुधः समः शुक्रशनीशत्रू रविबुधौचंद्रस्यामित्रे सर्वे अन्येसमाः गुर्विंदुसूर्याः भौमस्यामित्राणि शुक्रशनीसमौ बुधः शत्रुः शुक्रसूर्यौबुधस्यामित्रे भौमगुरुशनयः समाः चंद्रः शत्रुः रविचंद्रभौमाः गुरोर्मित्राणि शनिः समः बुधशुक्रौशत्रूबुधशनी शुक्रस्य मित्रे कुजगुरूसमौरविचंद्रौशत्रु सितज्ञौशनेर्मित्रेगूरुः समः रवींदुभौमाः शत्रवः ॥ १० ॥

	रवि.	चंद्र.	मंगळ.	बुध.	गुरु.	शुक्र.	शनि.
मित्र.	चं. गु. मं.	र. बु.	र. गु. चं.	र. शु.	र. चं. मं.	बु. श.	बु. शु.
सम.	बु.	मं. गु. शु. श.	शु. श.	मं. गु. श.	श.	मं. गु.	गु.
शत्रु.	शु. श.	०	बु.	चं.	बु. शु.	र. च.	र. चं. मं.

ग्रहांच्या दृष्टि. (पृथ्वीवृत्त.)

तृतीयदशमेग्रहोनवमपंचमेऽष्टांबुनी ॥
क्रमाच्चरणवृद्धितःस्मरगृहंततःपश्यति ॥
कुजःसितबुधौशशीरविबुधौसितक्ष्मासुतौ ॥
गुरुर्यमशनीगुरुर्भवनपाइमेमेषतः ॥ ११ ॥

टीका—अथ दृष्टीः पृथ्वीवृत्तेनाह तृतीयेति तृतीयदशमादिषुचरणवृद्धितः पश्यति तत्रतृतीयदशमे चरणदृष्ट्यापश्यति नवमपंचमेद्विचरणदृष्ट्यापश्यति अष्टांबुनी अष्टमचतुर्थे चरणत्रयदृष्ट्यापश्यति स्मरगृहंसप्तमंचतुश्चरणदृष्ट्यापूर्णपश्यतीत्यर्थः तृतीयदशमेशनिः नवमपंचमेगुरुः चतुर्थाष्टमेभौमः पूर्णदृष्ट्यापश्यतीति जातकांतरेसविशेषोज्ञेयः इमे कुजादयोमेषतः मेषमारभ्य भवनपाः राशीशाः मेषस्यकुजइत्यादि ॥ ११ ॥

अर्थ–ग्रह ज्या स्थानी असतो तेथून त्याची तृतीय दशम स्थानावर एकपाद दृष्टि, नवम पंचम स्थानावर द्विपाद दृष्टि, चतुर्थ अष्टम स्थानांवर त्रिपाद दृष्टि, व सप्तम स्थानावर पूर्ण दृष्टि असते.

अन्य ग्रंथांत शनीची आपल्या स्थानापासून तृतीय दशम स्थानीं, मंगळाची चतुर्थ अष्टम स्थानीं, गुरूची नवम पंचम स्थानीं पूर्ण दृष्टि असते असें आहे. हे तीन ग्रह सप्तम स्थानावरही पूर्ण दृष्टीनें पाहतात. शनि, गुरु व मंगळ यांस अनुक्रमे एकपाद, द्विपाद व त्रिपाद दृष्टि नाहीं.

राशि स्वामी.

राशी.	मेष.	वृषभ.	मिथुन.	कर्क.	सिंह.	कन्या.	तूळ.	वृश्चिक.	धन.	मकर.	कुंभ.	मीन.
ग्रह.	मं.	शु.	बु.	चं.	रवि	बु.	शु.	मं.	गु.	शनि	श	गु.

अध्यायाचा उपसंहार. (शालिनीवृत्त.)

हृद्यैःपद्यैर्गुंफितेसूरितोषेलंकाराख्येजातकेमंजुलेस्मिन् ॥
संज्ञाध्यायःश्रीगणेशेनवर्यैर्वृत्तैर्दिग्भिःसंयुतोऽयंप्रणीतः १२

इतिजातकालंकारे प्रथमोध्यायः ॥ १ ॥

टीका––अध्यायंसमापयति शालिन्या हृद्येति श्रीगणेशेनविदुषाउतश्रीविशिष्टेन गणेशेन अलंकाराख्ये अलंकारनामकेमंजुलेरुचिरेहृद्यैः पद्यैर्गुंफिते मनोहरैः श्लोकैःरचितेऽस्मिन्ग्रंथेवर्यैः श्रेष्ठैः दिग्भिः दशाभिः वृत्तैः श्लोकैः अयं आदिमः प्रथमः संज्ञाध्यायः प्रणीतः उक्तः रचित इत्यर्थः ॥ १२ ॥ इतिश्री जातकालंकारटीकायां प्रथमोऽध्यायः १

अर्थ–मनोहर पद्यांनीं रचिलेला विद्वान् लोकांस संतोषकारक जातकशास्त्राला अलंकाररूप मंजुळ असा संज्ञाध्याय श्रीगणेश कवींनीं दाहा वृत्तश्लोकें करून परिपूर्ण केला.

भावाध्यायः २

पंडितप्रार्थना.

श्लोक (पृथ्वीवृत्त.)

शुकाननसरोरुहाद्गलितमत्रभूमीतले ॥
फलंपरमसुंदरंसकलमाकलय्याधुना ॥

ब्रवीमितनुभावतःप्रवरदैववित्तोषदं ॥
यदत्रममचापलंकिमपितत्क्षमध्वंबुधाः ॥ १ ॥

टीका.—अथभावाध्यायोव्याख्यायते कविः स्वविनयंविशदयन् भावफलं वक्तुं पृथ्वीवृत्तेन प्रतिजानीते शुकेति शुकाननसरोरुहाद्गलितः अहंतनुभावतः ततः आरभ्य तत्फलं जातकफलंअधुनाब्रवीमि हे बुधाः पंडिताः अत्रवचनेममयत्किमपि चापलंस्यात् तद्यूयंक्षमध्वं इति प्रार्थना । किंकृत्वा ब्रवीमिअत्रभूमीतले शुकाननसरोरुहात् शुकमुखारविंदाद्गलितं शिष्यप्रशिष्यद्वारा प्राप्तंपरमसुंदरं सकलं फलं आकलय्यविचार्य कथंभूतं फलं प्रवरदैवविदां संतोषद उत्कृष्टज्योतिर्विदानंददं अन्यत्रोक्तमन्यतोग्राह्यमिति न्यायेनप्रथमंग्रहभावस्पष्टतातेषांबलंचज्ञातव्यं ततोभावसामान्यफलांतरं शुभपापमित्रग्रहदृष्टियोगादिकंभावषड्वर्गाः भावेशस्योदयास्तादिकं ज्ञातव्यं तदुक्तंपृथुयशसा योयोभावः स्वामिदृष्टोयुतोवासौम्यैर्वास्यात्तस्य तस्यास्तिवृद्धिः पापैरेवंतस्यभावस्य हानिर्निर्दिष्टव्याप्रश्नतोजन्मतोवा तत्रविशेषोगर्गजातके नीचस्थो रिपुगेहस्थो ग्रहोभावविनाशकृत् उदासीनोग्रहोमध्येमित्रस्वर्क्षत्रिकोणगः स्वोच्चस्थश्चग्रहोप्येवं भाववृद्धिकरः स्मृतः व्ययाष्टषष्ठभावेषुविपरीतफलमाह उशनाचार्यः सौम्याः पुष्टिंपापाविपर्ययसंश्रिता गृहाः कुर्युः मूर्त्यादिषुनिधनांत्यरिपुभावेव्युत्क्रमात्फलदाः अन्यच्च सौम्यवर्गाश्रिताभावाः शुभतांप्राप्नुवंतिहि पापवर्गाधिकानेष्टास्तन्वाद्यानात्रसंशयः लग्नलग्नाधिपौस्यातांबलाधिकतरौयादि तत्फलानांप्रवृद्धिःस्याद्धीनोहानिकरः स्मृतः एवंभावेषुसर्वेषु भाव भावेशयोर्बलात् ततोजजुषिवक्तव्याहानिर्वृद्धिश्चकोविदैरिति सर्वार्थचिंतामणौ लग्नादिभावाद्रिपुरंध्ररिःफे पापग्रहास्तद्भवनादिनाशः सौम्यास्तुतेपूक्तफलप्रदाः स्युस्तन्वादिकानांफलमेवमाहुः यद्भावनाथौरिपुरंध्ररिःफे दुःस्थानपोयद्भवनस्थितोवा तद्भावनाशंकथयंतितज्ज्ञाः शुभेक्षितेतद्भवनस्यसौख्यम् तत्तद्भावेत्रिकोणेव सुखमदनभेचास्पदेसौम्ययुक्तेपापानांदृष्टिहीनेभवनपसहिते पापखेटैरयुक्ते भावानांपुष्टिमाहुस्त्वथचशुभकरीमन्यथा त्वेप्रणाशंमिश्रंमिश्रैर्गृहेंद्रैः सकलमपि तथामूर्तिभावादिकाना ।मिति ॥ १ ॥

अर्थ.—शुकमुख कमलापासून अतिसुंदर पृथ्वीतलावर प्राप्त जाहलेलें जें जातकफल तें संपूर्ण एकत्र करून दैवज्ञ लोकांस संतोष होण्याकरितां लग्नादिद्वादश भावांचे अनुक्रमें करून फलादेश वर्णन करतों यामध्यें माझें जें चापल्य असेल तें पंडित लोक क्षमा करोत.

प्रथम भाव फलें.

देहाधीशःसपापोव्ययरिपुमृतिगश्चेत्तदादेहसौख्यं ॥
नस्याज्जंतोर्निजर्क्षेव्ययरिपुमृतिपस्तत्फलस्यैवकर्ता ॥

मूर्तौचेत्क्रूरखेटस्तदनुतनुपतिःस्वीयवीर्येणहीनो ॥ *
नानातंकाकुलःस्याद्व्रजतिहिमनुजोव्याधिमाधिप्रकोपम् २

टीका.—अथत्रिभिः श्लोकैस्तनुभावविषयमाह देहाधीशेति देहाधीशः लग्नस्वामीक्रूरयुक्तः पापग्रहेणयुक्तःव्ययरिपुमृतिगः द्वादशषष्ठाष्टमान्यतमस्थानगतश्चेत्तदाजातस्यदेहसौख्यंनस्यात् अस्ययोगस्यधनादिभावेविचार्यत्वद्योतनायप्रथमंयुक्तिरितिगम्यते यद्भावनाथोरिपुरंध्ररिः फेतद्भावनाशंकथयंतितज्ज्ञाः इतिप्राक्लिखितत्वात् अन्यदाहव्ययेशोव्ययेषष्ठेशः षष्ठेअष्टमाधीशोऽष्टमेचतत्फलस्यैवकर्तादेहसौख्याभावकर्तास्यात् अयमर्थोयवनमतेन विरुद्धः यथाबृहज्जातके रिपुभवनपेरिपुस्थेनीरुग्वैरी सुखीकृपणः निधनपतौनिधनस्थेव्यवसायी व्याधिवर्जितोऽप्युदितः विरोधशमनाय अयमर्थोबोध्यः देहाधीशेव्ययरिपुमृतिगेसतितद्भवनपेऽपितत्रस्थेशुभफलंस्यादितिन वाच्यं पूर्वोक्तयोगेसतिव्ययरिपुमृतिपःस्वभवनगतश्चेत्तत्फलस्यैवकर्तेतिवाच्यंयोगानामचिंत्यफलत्वादिति अथान्ययोगमाह मूर्ताविति मूर्तौलग्ने क्रूरग्रहः क्रूरखेटः तनुपतिः लग्नेशः स्वीयवीर्येणहीनः स्वकीयबलरहितश्चेत्तदाजातोमनुजः नानातंकाकुलः अनेकरोगाकुलः व्याधिरोगंआधिप्रकोपंचिंताव्याप्तत्वंव्रजति प्राप्नोतिबलत्वंपरपुंग्रहंनीचास्तत्वादिभिर्ज्ञेयं तदुक्तंजातकामृते स्वोच्चंमूलत्रिकोणंस्वगृहमधिसुहृद्गेहकंमित्रकंस्यादौदासीन्यंसमर्क्षंस्वरिपुभवनयोर्भेचनीचाभिधानं पूर्वेपूर्वेबलीयः परमपरमिदंहीनसत्वं तदस्मादित्यादिवत्पद्धतिप्रकारमतेनउत्तमबलत्वं समत्वं हीनबलत्वं च ज्ञेयं अल्पेबलेहीनबलइतिपद्धतिवचनात् ॥ २ ॥ अथातः स्रग्धरावृत्तं.

अर्थ—जर लग्नस्वामी पापग्रहांनीं युक्त असून षष्ठ, अष्टम, द्वादशस्थानीं असेल तर किंवा षष्ठ, अष्टम, द्वादशस्थानांचे स्वामी तेथेंच असतील तर देहसौख्य त्या मनुष्यास होणार नाहीं. जर लग्नांत पापग्रह असून लग्नाधिपति निर्बल असेल तर नानाप्रकारच्या रोगांनीं (देहजन्य) व मानसिक चिंतेनें सदा व्याप्त होईल. २

याच प्रमाणें पूर्वोक्त द्वादश भावांचे स्वामी षष्ठ, अष्टम, द्वादश या स्थानीं असून निर्बल असतील व पापग्रहांनीं युक्त असतील व त्याभावीं पापग्रह असतील त्या भावसंबंधीं सौख्य कमी होईल. तसेच षष्ठाधिपति षष्ठांत, अष्टमाधिपति अष्टमांत व व्ययस्थानाधिपति व्ययांत असेल तर देह सौख्य व त्या त्या भावांचें सौख्य सांगावें. किंवा षष्ठ, अष्टम, द्वादशस्थानचे स्वामी ज्या भावीं पापग्रहांनीं युक्त असतील व त्या भावाचा स्वामी निर्बल असेल तर त्या भावसंबंधीं सौख्य कमी सांगावें.

शुभ योग.

अंगाधीशःस्वगेहेबुधगुरुकविभिःसंयुतःकेंद्रगोवा ॥

* टीप.—ग्रंथांतीं २ कोष्टकें आहेत त्याप्रमाणें राशिग्रह स्वभाव कल्पनानुभव जाणून त्या ग्रंथानें फलादेश पहावा.

स्वीयेतुंगेस्वमित्रेयादिशुभभवनेवीक्षितःसत्वरूपः ॥
स्यान्नूनंपुण्यशीलःसकलजनमतःसर्वसंपन्निधानं ॥
ज्ञानीमंत्रीचभूपःसुरुचिरनयनोमानवोमानवानाम् ॥ ३ ॥

टीका.—अथशुभयोगानाह अंगाधीशः लग्नेशोलग्नेचेदित्येकोयोगः बुधकविभि र्युक्तोलग्नेशः केंद्रगइतिद्वितीयः स्वीयेतुंगेस्वोच्चे अजवृषभमृगांगनाकुलीरा झषवणिजौ चदिवाकरादितुंगाइत्याद्युक्ते स्वमित्रेस्वमित्रगृहे अथवा शुभभवने शुभगृहेशुभग्रहैः वीक्षितः लग्नेशइति तृतीयः एषामन्यतमयोगेजातोमानवः मानवानांमध्येभूपादिकः स्यात् भूपः भूपालः मंत्रीअमात्यः सर्वसंपन्निधानंसर्वसंपदामाश्रयः ज्ञानीभूपत्वा द्युपयुक्तज्ञानवान् सत्वरूपः सत्वगुणानुरूपः अतश्चपुण्यशीलः सुकृती सुरुचिरनयनः सुंदरनयनादिशरीरः सकलजनमतः सर्वजनमान्यः पुण्यशीलशब्देनसत्यार्जवादि एतदुक्तं जातकरहस्येयः सात्विकस्तस्यदयास्थिरत्वंसत्यार्जवं ब्राह्मणदेवभक्तिरिति ३

अर्थ—लग्नाधिपति लग्नांत, लग्नाधिपति बुध, गुरु व शुक्र यांनीं युक्त असून केंद्रांत. लग्नाधिपति उच्चींचा, लग्नाधिपति मित्रक्षेत्रींचा असून तो मित्र शुभग्रहापैकीं असावा शिवाय तो लग्नेश शुभग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तर तो मनुष्य सत्वगुणी, पुण्यवान्, सर्वजनास मान्य, सर्व संपत्तीचा उपभोग घेणारा मंत्री, सेनापति, सुंदर डोळ्यांचा व सर्वांत श्रेष्ठ असा तिन्हीं योगांनीं होतो.

तात्पर्य.

याचप्रमाणें ज्या ज्या भावावर योग घडतील त्या त्या भावांची वृद्धि सांगावी.

अशुभ योग.

लग्नेंक्रूरेऽथयातेखलखचरगृहंलग्ननाथेरवींदू ॥
क्रूरांतस्थानसंस्थावथदिनपनिशानाथयोर्द्यूनयायी ॥
भूमीपुत्रस्तुपृष्ठादुदयमधिगतश्चंद्रजश्चेन्मनस्वी ॥
स्यादंधोदुष्टकर्मापरभवनरतःपूरुषःक्षीणकायः ॥ ४ ॥

टीका.—अथानिष्टयोगत्रयंश्लोकेनाह क्रूरे लग्नेक्रूरग्रहराशौलग्नेशः स्थितः अयं एकोयोगः रवींदूपुष्पवंतौ क्रूरयोर्ग्रहयोर्मध्यस्थौ क्रूरमध्यस्थौक्रूरमध्यत्वंराश्यंशापेक्ष यावाज्ञेयं संकोचेप्रमाणाभावात् अयंद्वितीयोयोगः अथदिनपनिशानाथयोःसूर्याचंद्रम सोः द्यूनयायी सप्तमगः भौमः बुधःपृष्ठादुदयंअधिगतः पृष्ठोदयराशौस्थितइति तृतीयोयोगः अत्रजातः पुरुषः मनस्वीप्रशस्तमनाइत्यर्थः अंधः दुष्टकर्मापरभवनरतः परगृहवासरतः परस्त्रीरतोवास्यात् क्षीणकायः क्षीणशरीरश्चमनस्वित्वंतत्कालगतचंद्रस्यबल-

त्वेबोध्यं एवंतनुभावस्यशुभाशुभयोगाउक्ताः ननुकचिच्छुभयोगेऽपिशुभफलंनोपलभ्यते तथा अशुभयोगेऽशुभफलामिति तत्रकोविशेषइतिचेत्सत्यं क्रूरग्रहदृष्टयुतत्वादियोगेन अयं भावः शुभयोगकारकग्रहोपरिक्रूरदृष्टौसत्यांविनिश्चयप्राप्तंफलं नोपलभ्यते अशुभयोगकर्तरिग्रहोपरिशुभदृष्ट्याऽशुभंनोपलभ्यते ताजिककारैरित्थशालस्यदृष्टिमयुतमणऊंयोगेनभजंतंकृतमुक्तं बृहज्जातककारेण नशुभाउदितायोगायथाभवंति शुभेक्षिताइत्युक्तं इति तनुभावः ॥ ४ ॥

अर्थ.—लग्नीं पापग्रह असून लग्नाधिपति पापग्रहाचे राशीस असेल तर सूर्य चंद्र क्रूर ग्रहांचेमध्यें असतां ह्मणजे ज्यावेळेस एकाच राशिवर रविचंद्र पापग्रहाचेमध्यें असतां ह्मणजे राशीनें किंवा अंशानें जसें--एक राशीस मंगळ १० अंश. रवि १२ अंश. शनि १४ अंश. चंद्र १६ अंश. राहु २० अंश असे असतील तर किंवा तसेंच एक राशीस मंगळ पुढील राशीस रवि त्याचे पुढील राशीस शनि, त्याचे पुढें चंद्र व त्याचे पुढल्या राशीस राहु असेल तर सूर्य चंद्रापासून सप्तमस्थानीं मंगळ व पृष्ठोदय राशीस बुध असतां तो मनुष्य मनस्वी, अंधदुष्टकर्म करणारा परगृहांत वास करणारा किंवा परस्त्रीरत, रोगी असा ह्या तीन योगांनीं होतो.

तात्पर्य.

शुभफल देणारे ग्रहांवर जर क्रूर ग्रहांची दृष्टी असेल तर तें शुभफल पूर्ण मिळणार नाहीं. तसेंच पापफलयोग करणारे ग्रहांवर जर शुभग्रहांची दृष्टी असेल तर तें वाईट फलही होणार नाहीं.

एकंदरींत योग पाहाण्याचा साधारण नियम असा आहे कीं, ज्या भावाचा स्वामी त्या भावींच किंवा त्या भावास पहात असेल व शुभग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तर त्या भावाची वृद्धि समजावी. व तो भाव पापग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असेल व त्याच्या स्वामीनें तो युक्त किंवा दृष्ट नसेल तर त्या भावाची हानि सांगावी. गुरु ज्या स्थानीं असतो त्या स्थानाचा नाश करतो फक्त स्वगृहींचा असला तर मात्र नाश करीत नाहीं. तसेंच ज्या भावांस पहात असेल त्यांची वृद्धि करतो तसेंच शनि ज्या स्थानीं असतो त्या भावाची वृद्धि करतो व ज्या भावावर पहात असेल त्यांचा नाश करतो फक्त स्वगृहावर पहात असेल तर नाश करीत नाहीं. इति प्रथम भाव विचारः

द्वितीयभाव फलें.

कोशाधीशःस्वराशौसुरगुरुसहितःसर्वसंपत्प्रदःस्यात् ॥
केंद्रेवाथत्रिकेचेद्भवतिहिमनुजःक्लेशभाक्द्रव्यहीनः ॥
स्वांत्याधीशौत्रिकस्थौकवितनुपयुतौस्यात्तदानेत्रहीनः ॥
चंद्रःपापेनयुक्तोधनभवनगतःशुक्रयुक्नेत्रहीनः ॥ ५ ॥

टीका.—अथधनभावफलं श्लोकद्वयेनब्रुवन् प्रथमेनयोगचतुष्टयमाह कोशाधीश इति कोशाधीशः धनेशः गुरुयुतः केंद्रेवाचेत्तदाजातस्य सर्वसंपत्प्रदः स्यात् अथानंतर मन्ययोगउच्यतेइत्यर्थः गुरुयुतोधनाधीशः त्रिकेषु षष्ठाष्टमद्वादशेषु अन्यतमेचेज्जातोमनुजः क्लेशभाक्द्रव्यहीनश्चस्यात् सगुरुः धनाधीशः षष्ठेचेदर्थयोगः शिथिलोऽर्थः तंप्रतिचाल्पधनयोगसद्भावात् धनाधीशस्यशुभत्वेमध्यधनयोगसद्भावात् तदुक्तंबृहज्जातकेलग्नादतीववसुमान् वसुमान्शशांकात्सौम्यग्रहैरुपचयप्रगतैः समस्तैः द्वाभ्यांसमोऽल्पवसुमांश्चतदूनतायामन्येषुसत्स्वपिफलंत्विदमुक्तकेन अथान्ययोगः स्वांत्याधीशौद्वितीयद्वादशाधीशौशुक्रलग्नेशयुक्तौचेत्तदाजातः नेत्रहीनः अंधःस्यात् अथान्ययोगः शुक्रपापाभ्यांयुक्तश्चंद्रोधनस्थश्चेत्तदाजातोनेत्रहीनइति ॥ ५ ॥

अर्थ.—द्वितीय स्थानाचा स्वामी द्वितीय स्थानींच किंवा केंद्रांत असतां, किंवा केंद्री स्वराशीचा असला तर, तो ग्रह सर्व संपत्तीतें देणारा होतो. केंद्री किंवा स्वराशीचा धनाधिपति गुरुयुक्त असतां सर्व संपत्तीतें देतो. षष्ठ, अष्टम, द्वादश या स्थानीं धनाधिपति गुरुयुक्त असतां सर्व क्लेश भोगणारा व द्रव्यहीन तो मनुष्य होतो. धनापति गुरु षष्ठस्थानीं असेल तर सामान्य धनवान् होतो.

यावरून ज्या ज्या भावांचा स्वामी स्वराशीस किंवा केंद्री गुरुयुक्त असेल त्या त्या भावांची वृद्धि सांगावी. व ज्या भावांचा स्वामी गुरुयुक्त षष्ठ, अष्टम व द्वादशांत असून त्या भावास पहात नसेल तर त्या भावांची हानि सांगावी.

द्वितीय स्थानाचा व व्ययस्थानाचा अधिपति षष्ठ, अष्टम, द्वादशस्थानांत असून शुक्र व लग्नाधिपति यांनीं युक्त असेल तर तो मनुष्य नेत्रहीन होतो (आंधळा होतो.) चंद्र पापग्रहांनीं व शुक्रानें युक्त होऊन द्वितीय स्थानांत असेल तरीही नेत्रहीन होतो.

द्वितीयभावफलें.

शुक्रःसेंदुस्त्रिकस्थोजनुषिनिशिनरःप्राप्नुयादंधकत्वं ॥
जन्मांधःसार्कशुक्रस्तनुभवनपतिःस्यात्तदानींमनुष्यः ॥
एवंतातानुजांबासुतनिजगृहिणीस्थाननाथास्थिताश्चेत् ॥
आदेश्यंतत्रतेषांप्रवरमतियुतैरंधकत्वंतदानीम् ॥ ६ ॥

टीका.—अन्ययोगत्रयंतत्रद्वितीययोगस्य तातादिष्वतिदेशंचाह जनषिजन्मसमयेसेंदुःसचंद्रः शुक्रःत्रिकस्थः षष्ठाष्टमद्वादशेषु अन्यतमेचेत्तदाजातोमनुजः निशिअंधकत्वं प्राप्नुयात् निशांधःस्यात् सार्कशुक्रः सूर्यशुक्रयुतः तनुभवनपतिः लग्नेशःत्रिकस्थ इत्यनुषंगः तदानींजातोमनुजः जन्मांधः जन्मनैवांधःस्यादिति तातादीनांस्थाननाथाः एवंपूर्वोक्तप्रकारेणसार्केंदुशुक्रास्त्रिकस्थाश्चेत्तदानींतेषांतातादीनांअंधकत्वं प्रवरमतियुतै

रादेश्यंवक्तव्यं तत्रतातः पिता अनुजः कनिष्ठभ्राता अंबामातानिजगृहिणीभार्या प्रवरमतिशब्देन तातादीनांजन्मन्यपि अंधयोगज्ञानत्वंसूच्यते इति धनभावः ॥ ६ ॥

अर्थ.—जन्मकुंडलींत शुक्र चंद्रानेंयुक्त षष्ठ, अष्टम, द्वादशस्थानांत असेल तर त्या मनुष्यास रातांधळें असतें. सूर्याशींयुक्त शुक्र व लग्नेश असेल तर तो मनुष्य जन्मांध होतो.

तात्पर्य.

याप्रमाणें लग्नापासून द्वादशस्थानाचे स्वामी शुक्ररवीशींयुक्त असतील तर त्या भाव संबंधीं मनुष्य आंधळे होतील.

तृतीयभाव फलें.

भ्रातृस्थानेशभौमौव्ययरिपुनिधनस्थानगौबंधुहीनः ॥
स्वक्षेत्रेसौम्यदृष्टेसहजभवनपेमानवःस्याच्चतद्वान् ॥
केंद्रस्थेबंधुसौख्यंशुभविहगयुतेस्याददभ्रंनराणां ॥
पापैश्चेदन्यथैतत्तदनुनिजधियाज्ञेयमित्थंसमस्तम् ॥ ७ ॥

टीका.—अथभ्रातृसंभवतत्सुखादियोगानाह भ्रातृस्थानेशभौमौतृतीयाधिपति भौमौव्ययरिपुनिधनस्थानगौ १२।६।८ त्रिकस्थौयदि तदाजातः बंधुहीनः सामान्य शब्द निर्देशेनसहोदरबंधवोविवक्षितास्तैरहितइत्यर्थः सहजभवनपेसहजाधिपेस्वक्षे त्रेस्वगृहेसौम्यदृष्टेशुभग्रहदृष्टेसतिमानवः तद्वानबंधुवान्स्यात् सहजाधिपेशुभग्रहयुतेकेंद्र स्थे अदभ्रंबहुबंधुसौख्यंस्यात् केंद्रस्थेसहजभवनपेपापग्रहैर्युतश्चेदन्यथाबंधुसौख्यंन- स्यात् युतेदृष्टेइत्युपलक्षणं इत्थं अमुनाप्रकारेण बुद्धिमद्भिर्निजधियास्वबुध्यासमस्तंभा- वफलं तदनुयोगविचारानंतरंज्ञेयं अयमर्थः योगेसत्यपियोगकर्तृषुभूयसीपापदृष्टिः पा पयोगः योगकर्तृणांनीचास्ततायोगेप्रागुक्तं लक्षणं नस्यात् । इतितृतीयोभावः ॥ ७ ॥

अर्थ.—तृतीय स्थानाचा स्वामी षष्ठ, अष्टम, द्वादशस्थनांत भौमयुक्त असेल तर बंधु- हीन होतो. तसेंच तृतीयस्थानाचा स्वामी तृतीयस्थानीं किंवा केंद्रीं शुभग्रहानीं युक्त किंवा दृष्ट असेल तर बंधु सौख्य भोगतो. तृतीयस्थानाचा अधिपति स्वोच्चीं पूर्णबली असेल तर निरंतर बंधु सौख्य होतें. तोच तृतीयस्थानाचा अधिपति पापग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तर बंधुसौख्य होणार नाहीं. येथें सहोदर बंधु घेणें.

याप्रमाणें द्वादशभावांचीं फलें जाणावीं.

चतुर्थभाव फलें,

पातालेशःस्वराशौशुभखचरयुतोभाग्यनाथेनयुक्तः ॥
सामंतःस्यात्ततश्चेत्सुरपतिगुरुणावाहनेशस्तनुस्थः ॥

संदृष्टोराजपूज्यस्तदनुचहिबुकाधीश्वरोलाभसंस्थो ॥
यानंपश्यन्नराणांनिवहमभिमतंवाहनानांप्रदत्ते ॥ ८ ॥

टीका.—अथचतुर्थभावफलंवदन् योगचतुष्टयमाह पातालेशः चतुर्थेशः स्वराशौशुभखचरयुतः शुभग्रहयुक्तःसन् भाग्यपेन भाग्यस्वामिनायुक्तश्चेज्जातः सामंतः स्यात् मांडलिकः स्यात् ततोयोगांतरं लग्नस्थः वाहनेशोगुरुणापूर्णदृष्ट्यादृष्टश्चेत्तदाजातः राजपूज्यः राजकृतसन्मानभाजनंस्यात तदनुगुरुदृष्टः सुखेशः लाभगश्चेत् यद्वागुरुदृष्टः सुखेशः यानंपश्यन्भवतितदावाहनानांनिवहं समूहं नराणांअभिमतंप्रदत्ते इदंयोगद्वयंवाशब्दप्रयोजकेऽपिज्ञेयं अन्य योगलाभाच्चतुर्थदृष्टिविरहात् योगप्रभावप्रसंगात् ॥८॥

अर्थ.—चतुर्थभावाचा स्वामी चतुर्थस्थानांत असून शुभग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असून शिवाय नवमेशानें (नवमभावाधिपतीनें) युक्त असेल तर मांडलिक राजा होईल. चतुर्थ स्थानाधिपति लग्नीं असून गुरु त्यास पूर्ण पहात असेल तर तो मनुष्य राजपूज्य होईल. चतुर्थस्थानाचा स्वामी एका दशस्थानीं असून त्यावर गुरूची दृष्टि असेल तर किंवा गुरु चतुर्थस्थानास पहात असेल तर त्या मनुष्यास इच्छित वाहनादिकांचें जन्मभर सौख्य मिळतें. सामान्यतः हे चार योग शुभ आहेत. ॥ ८ ॥

गृहप्राप्तियोग.

स्वक्षेत्रेतुर्यनाथस्तनुपतिसहितःस्यादकस्माद्गृहाप्तिः ॥
सौहार्दंवासुहृद्भिस्तादितरगृहगश्चेद्गृहालभ्ययोगः ॥
यावंतःपापखेटाधनदशमगृहप्रांत्यपैश्चेत्रिकस्था ॥
युक्तास्तावत्प्रमाणाज्वलनवशगताःक्लेशदाःस्युर्गृहानुः॥९

टीका—अथगृहप्राप्त्यादियोगानाह लग्नेश सहितश्चतुर्थभावनाथः स्वक्षेत्रे चतुर्थभवनेचेत्तदा जातस्य अयत्नतो गृहाप्तिः गृहलाभःस्यात् तथासुहृद्भिः हितकारकैर्जनैःसौहार्दंप्रीतिः सुहृज्जनयुक्तंगृहादिस्यादित्यर्थः तनुपतियुक्तः चतुर्थनाथः तदितर गृहगः चतुर्थभवनादन्यभवनस्थश्चेत्तदागृहालभ्ययोगः गृहप्राप्त्यभावः यावंतः क्रूरग्रहाः द्वितीयदशमचतुर्थद्वादशनाथैः सहिताः त्रिकस्थाः तावंतोगृहाः जातस्यनुः नरस्य वन्हिवशगतादग्धाः अतएवक्लेशदाः स्युः अत्रधनेशादीनांचतुर्णांसमुदितानामेकयोगोनविवक्षितः त्रिकभवनेयोवाप्रांत्यसद्भावेसावकाशत्वात् ॥ ९ ॥

अर्थ—चतुर्थ स्थानचा स्वामी चतुर्थ स्थानींच असून लग्नेशानें युक्त असेल तर यत्नावांचून त्या मनुष्यास घर मिळेल. व वरील योग असून शिवाय चतुर्थ स्थानेशाचे मित्र चतुर्थ स्थानाला पहात असतील तर मित्र लोकांशीं प्रीतियुक्त होईल. चतुर्थ स्थानाधिपति चतुर्थ स्थान सोडून अन्य स्थानांत असेल तर घर मिळणार नाहीं. स्वराशीचा चतुर्थ स्था-

नाधिपति अन्य ठिकाणीं असून शुभग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तर आयासानें घर मिळेल. लग्नापासून २ रे १० वे ४ थे १२वे या स्थानाचे स्वामी जितक्या पापग्रहांनीं युक्त असून ६ वे ८ वे १२ वे या स्थानीं असतील तितक्या वेळ त्या मनुष्याचें घर जळेल. ९

तात्पर्य.

ज्या ज्या स्थानांचे स्वामी जितक्या पापग्रहांनीं युक्त असून ६ वे १२ वे व ८ वे या स्थानीं असतील तितके त्या भावसंबंधी कष्ट सांगावे.

वाहननाशयोगः

यावंतोवाहनस्थाःशुभविहगदृशांगोचरानोभवेयुः ॥
तावंतोवाविरामाःपरमगुणवतांवाहनानांनृणांस्युः ॥
क्रूराःपश्यंतियानंव्ययनिधनगताश्चेत्तदातद्वदेव ॥
प्राज्ञैरादेश्यमेषांखलुशुभकरणंशांतिकंवाहनानां ॥१०॥

टीका–अथ वाहनविराम योगौतच्छांति करणंचाह क्रूरइत्यनुषंगः यावंतः वाहनस्थाः चतुर्थस्थाः शुभविहगदृशांगोचरानोभवेयुः शुभग्रहदृष्टानस्युः तावंतः परमगुणवतां प्रकृष्ट गुणयुक्तानां वाहनानांविरामाः विनाशाःस्युः अथ द्वादशाष्टमगताः क्रूराः यावंत इत्यनुषंगः चतुर्थपश्यंतिचेत्तदा पंडितैस्तद्वदेवदृष्टक्रूरग्रहसंख्याप्रायेस्ववाहनानांविरामाः स्युरित्यर्थः तत्र वाहनानांशुभकरणंशांतिकंप्राज्ञैः आदेश्यं विधेयमितिशेषः इति चतुर्थभावः ॥ १० ॥

अर्थ–चतुर्थ स्थानीं जितके पापग्रह असतील त्यांस शुभग्रह कोणीही पहात नसेल तर उत्कृष्ट वाहनें तितकीं मरतील. जितके पापग्रह द्वादश, अष्टम स्थानांत पडून चतुर्थ स्थानांस पहात असतील तितकीं त्या मनुष्याचीं वाहनें मरतील. या योगांत वाहननाशक जे ग्रह असतील त्या ग्रहांचें पूजनादिक करावें.

तात्पर्य.

द्वादश अष्टम स्थानांत पडलेले जितके पापग्रह ज्या ज्या स्थानाला पूर्ण पहात असतील त्या त्या भावसंबंधी नाश होतो. हें सर्व ग्रहबलानें जाणावें.

पंचमभावफलें.

विद्यास्थानाधिपोवाबुधगुरुसहितश्चेत्त्रिकेवर्तमाने ॥
विद्याहीनोनरःस्यादथनवमनिजक्षेत्रकेंद्रेषुतद्वान् ॥
बालत्वंवृद्धतावायदिगगनसदांजन्मकालेतदास्यात् ॥
प्रज्ञामांद्यंनराणामथयदिविहगःस्वर्क्षगोदोषहृत्स्यात् ॥११

टीका.—अथपंचमभावफलम् निरुपायनविद्याबुद्धियोगानाह विद्यास्थानाधिपः पंचमेशः केवलोवाबुधगुरुसहितोवात्रिकेवर्तमानश्चेत्तदाजातो विद्याहीनः त्रिकस्थेपंचमेशेबुधगुरुयोगेविद्याद्यनुकूलोनास्तीति वा शब्देन द्योतितं अथपंचमेशः पंचमनवमकेंद्रेषुस्थितश्चेत्तदाजातः विद्यावान् बुधगुरुयोगेविद्यावत्त्वं किमुत वक्तव्यमितिगम्यते अथजन्मकाले प्रज्ञायोगकर्तॄणांगगनसदांग्रहणां बालत्वं वृद्धतावायदि तदा जातानां प्रज्ञामांद्यं अल्पबुद्धिः स्यात् यदिबालोवृद्धोवाग्रहः स्वक्षेत्रगः तदादोषहृत् प्रज्ञामांद्यत्वप्रयोजकदोषं दूरीकुर्यादित्यर्थः ॥ ११ ॥

अर्थ.–पंचम स्थानाचा स्वामी बुध गुरूनीं युक्त असून जर एकटा षष्ट, अष्टम, द्वादश यास्थानीं असेल तर तो मनुष्य विद्याहीन होतो. आणि तोच ग्रह नवमस्थानीं किंवा स्वक्षेत्रीं (पंचमस्थानीं) किंवा केंद्रीं एकटा असेल किंवा बुध गुरूनीं युक्त असेल तर अधिक विद्यावान् होतो. आणि तो पंचमेश बाल्य किंवा वृद्ध अवस्थेंत असेल तर तो मनुष्य बुद्धीनें मंद होईल. आणि तो पंचमेश स्वराशीचा असेल तर मध्यम बुद्धिवान् होईल. व बाल्य वृद्ध अवस्थेंत नसून स्वराशीचा असेल तर तीव्र बुद्धिवान् होतो. पंचम स्थानचा स्वामी एकादशस्थानीं असला तरी विद्यावान् होतो.

मूकत्वयोग व पुत्राभावयोग.

वाक्स्थानेशोगुरुर्वाव्ययरिपुविलयस्थानगोवाग्विहीन
श्चैवंपित्रादिकानांपतयइहयुतामूकतास्याच्चताभ्यां ॥
वागीशात्पंचमेशस्त्रिकभवनगतःपुत्रधर्मांगनाथा
रंध्रद्वेष्यांतिमस्थायदिजनुषिनृणामात्मजानामभावः १२

टीका.—अथमूकत्वसंतानाभावयोगानाह वाक्स्थानेशोपंचमेशोगुरुर्वाव्ययरिपुविलयस्थानगः त्रिकस्थस्तदा वाग्विहीनः मूकः स्यात् अथपित्रादिमूकतायोगमाह एवंप्रकारेणपित्रादिभावानांदशमभावादिराशीनांपतयस्ताभ्यांपंचमेशगुरुयुताः त्रिके तिष्ठंतिचेत्तदातातादीनांमूकत्वंस्यात् आदिशब्दात् अनुजादयोज्ञेयाः अथजन्मनिजीवात जीवाधिष्ठितराशेः पंचमेशः त्रिकस्थः पुत्रधर्मांगनाथाः पंचमनवमलग्नेशाः जन्मलग्नात्रिकस्थाः यदितदापुत्राणामभावोवाच्यः ॥ १२ ॥

अर्थ.—पंचम स्थानाधिपति किंवा गुरु षष्ठ, अष्टम, द्वादश यास्थानीं असेल तर तो मनुष्य मुका होतो. ज्या ज्या भावाचे कारकग्रह गुरूनें युक्त होऊन लग्नापासून किंवा भावापासून किंवा कारकस्थित राशिपासून षष्ठ, अष्टम, द्वादश यास्थानीं असतील तर त्या त्या भावसंबंधि मनुष्यास मूकत्व सांगावें. ते ग्रह शुभ मित्र ग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असतील तर वाणीमध्यें विकार सांगावा. लग्नापासून किंवा चंद्रापासून किंवा कारक ग्रहापासून पंचमस्थानाचा स्वामी पंचमस्थानींच किंवा त्या स्थानावर त्याची दृष्टि असेल तर

मूकत्व मुळींच होणार नाहीं. गुरूपासून पंचमाधिपति षष्ठ, अष्टम, द्वादश यास्थानींअसून लग्नापासून पंचम, नवम व लग्नेश यांनीं युक्त असेल तर संतति मुळींच होणार नाहीं. किंवा गुरुपासून पंचमेश षष्ठ, अष्टम, द्वादश यास्थानीं असून पंचमेश अष्टमांत, नवमेश षष्ठांत व लग्नेश द्वादशांत असे असतील तर संतति होणार नाहीं. हा योग लग्न, चंद्र, कारक व भाव यांपासून जर घडला तर संततीचा अभावच सांगावा. असे प्रत्येक ठिकाणीं विचार करणें.

संततियोग.

किंचित्कालंविलंबःशुभखगसहितास्तेऽथकर्केसुतर्क्षे ॥
चंद्रेकन्याप्रजावान्प्रमिततनयवांश्चाथदेवेंद्रपूज्यात् ॥
क्रूरश्चेत्पंचमस्थःसुतभवनगतःस्यात्तदापत्यहीन ॥
श्छायापुत्रःस्वगेहाद्यदिभवतिसुतेसूनुरेकस्तदानीं ॥ १३

टीका.—अथसंतानयोगमाह तेपुत्रधर्मांगनाथाः शुभखगसहिताश्चेत्तदासंतानोत्पत्तौकिंचित्कालंविलंबःस्यात् शुभग्रहदशांतर्दशाबलापेक्षयाविलंबइतिभावः अथकर्कराशौपंचमभावेचंद्रश्चेत्तदाकन्याप्रजावान् अथवा प्रमिततनयवान् स्वल्पापत्यः स्यात् अथदेवेंद्रपूज्यात् जीवात्पंचमस्थः क्रूरश्चेत् जीवोऽपिलग्नात्पंचमगस्तदापत्यहीनः संतानरहितःस्यात् यदिस्वगेहात्स्वराशितः पंचमेछायापुत्रःशनिश्चेत्तदाएकपुत्रः स्यात् अत्रसंपूर्णदृष्ट्याशुभकृतस्यशनेः स्वराशेः पुत्रभवनेदृष्ट्यानेकपुत्रयोगस्तदाद्विभौमयोः स्वगेहात्पंचमस्थयोरेकपुत्रत्वंकिमुतवक्तव्यमिति गूढोऽभिप्रायः ॥ १३ ॥

अर्थ—पूर्वी सांगितलेले संतति प्रतिबंधकारक ग्रह शुभ ग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असतील तर विलंबानें संतति प्राप्त होईल. लग्नापासून पंचमस्थानीं कर्कराशि असून चंद्र तेथें असेल तर कन्या संतति पुष्कळ सांगावी. तसेंच शुक्र स्वराशीचा पंचमांत असला तर याचप्रमाणें सांगावें. नवमस्थानीं पापग्रह, गुरु पंचमस्थानीं असेल तर संतति होणार नाहीं. मकरापासून किंवा कुंभापासून पंचमस्थानीं शनि असेल तर एक मुलगा होईल असें जाणावें.

संततियोग.

कुंभेचेत्पंचपुत्रास्तदनुचमकरेनंदनेप्यात्मजाःस्युः ॥
तिस्रोभौमःसुतानांत्रितयमथसुतादायकोरौहिणेयः ॥
इत्थंकाव्यःशशांकोजनुषिचगुरुणाकेवलेनैवपुत्राः ॥
पंचस्युःकेतुराह्वोःक्रियवृषभवनेकर्कटेनोविलंबः ॥१४॥

टीका—अथ अन्ययोगमाह नंदनेपंचमभावे कुंभे छायासूनुरित्यनुषंगः यदि

तदापंचपुत्राः स्युः मकरे आत्मजाः तिस्रः मकरस्यस्त्रीराशित्वादितिभावः भौमे मकरेचेदित्यनुषंगः सुतानां त्रयंस्यात् अथ रौहिणेयः बुधःपंचमेसुतादायकः कन्याप्रदः इत्थंशुक्रश्चंद्रोऽपि पंचमे सुतादायकः एवं केवलेन ग्रहयोगरहितेन पंचमस्थेन गुरुणापंचपुत्राः स्युः पंचमे मेषे वृषे कर्केवा केतुराव्होरेकतरे इतिशेषः नो विलंबः संतानोत्पत्तौ प्रतिबंधो न भवतीत्यर्थः नोविलंबइत्यनेनसूचितं मकरकुंभातिरिक्तराशौ पंचमेशनौ मकरमंतरेणतत्रस्थेभौमेक्रियादिराशीन्विहायपंचमे राहौ वा केतौसंततेर्विलंब एवेति सूचितम् ॥ १४ ॥

अर्थ.—पंचम स्थानीं कुंभराशीचा शनि असेल तर पांच मुलगे होतील. आणि पंचमस्थानीं मकरराशीचाशनि असेल तर तीन कन्या होतील. मकरींचा मंगळ पंचमस्थानीं असेल तर तीन मुलगे होतील. पंचमस्थानीं बुध, शुक्र, चंद्र, कोणतेही राशीस असतील तर कन्या संतति सांगावी. गुरु पंचमस्थानीं स्वराशीचा असेल तर पांच मुलगे होतील. पंचमस्थानीं मेष, वृषभ, कर्क ह्या राशींस राहु किंवा केतु असेल तर लवकर (अल्पवयांतच) संतति होईल.

संततीचा काळ.

पापोवावासवेज्यःसुखभवनगतःपंचमेवाष्टमेवा ॥
शीतांशुःसंततेःस्यात्खगुणमितसमातुल्यएवप्रबंधः॥
यावंतःपापखेटास्तनयगृहगताःसौम्यदृष्ट्यावियुक्ताः ॥
तावद्वर्षप्रमाणोनियतमिहभवेत्संततेर्वाविलंबः॥ १५॥

टीका—ननुकतिवर्षाणिविलंबइत्याह पापग्रहोजीवोवा चतुर्थस्थः पंचमेषष्ठेवा चंद्रः खगुणमित समातुल्यः त्रिंशद्वर्षमितः प्रबंधः संततेरित्यनुषंगः प्रकृष्टोबंधः शुभग्रहदृष्ट्यावियुक्ताः यावंतःपंचमस्थाः क्रूरग्रहाः स्युः बलाधीनफलाः खगइत्युक्तप्रकारैः स्थानदिगादिबलरूपकैः कितदिति ध्येयंतावद्वर्षप्रमाणः संततेर्निश्चयेनविलंबः स्यादित्यर्थः ॥ १५ ॥

अर्थ.—चतुर्थ स्थानीं पापग्रह किंवा गुरु असून पंचमस्थानीं किंवा अष्टमस्थानीं चंद्र असेल तर तीस वर्षे पर्यंत संतति होणार नाहीं. जितके पापग्रह पंचमस्थानीं असून शुभग्रहांचे दृष्टीनें रहित असतील तितके वर्ष प्रमाण संततीला विलंब सांगावा. ते ग्रह पूर्ण बली असतील तर त्रिगुणित (तिप्पट) वर्षप्रमाण, मध्यम बली असतील तर दुप्पट वर्षप्रमाण व हीनबली असतील तर एकपट वर्षप्रमाण संततीस विलंब लागेल.

संतति होण्याचे उपाय.

तत्प्राप्तिर्धर्ममूलातदनुबुधकवीशंकरस्याभिषेकात् ॥
चंद्रश्चेत्तद्ददेवात्रिदिवपतिगुरुर्मंत्रयंत्रौषधीनाम् ॥

सिद्ध्यामंदारसूर्यायदिशिखितमसीतत्रवंशेशपूजा ॥
कार्याम्नायोक्तरीत्याबुधगुरुनवपाःक्षिप्रमेवात्रसिद्धिः १६

टीका.—अथ प्रतिबंधकभंजकंसंतानोपायमाह तत्प्राप्तिः संततिप्राप्तिः धर्ममूलाश्रुतिस्मृतिविधिगतोधर्मः मूलंहेतुर्यस्याः सा तथा आदित्यसप्तमीव्रत शंकराराधन संतान गोपालमंत्रजपहरिवंशश्रवणादि विहितधर्ममूलेतिभावः अत्रविशेषः तदनुतत्पश्चाद्बुधकवीविलंबप्रयोजकौचेत् शंकरस्याभिषेकाद्रुद्राध्यायोक्तमंत्रकरणकाभिषेकात्तत्प्राप्तिरित्यनुषंगः चंद्रश्चेत्पूर्ववत्ज्ञेयं गुरुश्चतथायदायत्रौषधीनांसिद्ध्यासिद्धिशब्दः यंत्रादिभिः प्रत्येकंसंबध्यतेयंत्रसिद्ध्याऔषधिसिध्येति मंत्राचरणेन यंत्रग्रंथोक्तानि यंत्राणिसंतानगोपालमृत्युंजयादीनि ओषध्यः लक्षणाद्यास्तासांसिद्धिः विधिवदनुष्ठानसाध्यफलेत्यर्थः शनिभौमसूर्यराहूणांमध्येकस्यचित्प्रतिबंधकत्वे तत्रवंशेशपूजाकुलदेवतापूजनं आम्नायोक्तरीत्याकार्या आम्नायशब्दः वेदस्मृतिपुराणाद्युपलक्षणः तत्रापिविशेषः बुधगुरुनवमस्थानपाः प्रतिबंधकाश्चेदुमानुष्ठानात् शीघ्रमेवसिद्धिः स्यादिति । इतिपंचमभावः ॥ १६ ॥

अर्थ.—संततीची प्राप्ति सद्धर्माचरणानीं होते ह्मणून संततिप्रतिबंधक बुध, शुक्र व चंद्र असतील तर महादेवास अभिषेक करावा, गुरु संततिप्रतिबंधक असेल तर मंत्र, यंत्र, ओषधी यांचे सिद्धीनें, शनि, मंगळ, सूर्य, राहु व केतु हे ग्रह संततिप्रतिबंधक असतील तर कुलदेवतेचें पूजन वेदोक्त मंत्रानें करावें. बुध गुरु व नवमेश प्रतिबंधक असतील तर देवीचें आराधन करावें ह्मणजे संतति प्राप्त होते. ॥ १६ ॥

षष्ठभाव फलें.

षष्ठेशेपापयुक्तेतनुनिधनगतेनुःशरीरेव्रणाःस्युः ॥
चादेश्यंतज्जनित्रीजनकसुतवधूबंधुमित्रादिकानां ॥
इत्थंतत्स्थानगामीशिरसिदिनमणिश्चाननेशीतभानुः ॥
कंठेभूमीतनूजोहृदिशशितनयोवाक्पतिर्नाभिमूले ॥ १७ ॥

टीका.—अथरिपुभावफलं वक्तुकामस्तावद्व्रणरोगानाह पापग्रहयुतेषष्ठेशे लग्नाष्टमगतेसति नुः मनुजस्यशरीरेव्रणाःस्युः इत्थमुक्तप्रकारेणजनित्र्यादिभावानामीशेपापयुक्तेतनुनिधनगतेतेषांव्रणाः स्युः इत्यादेश्यंवक्तव्यं अंगविशेषव्रणानाह तत्स्थानगामी तनुनिधनगतः षष्ठेशोदिनमणिः सूर्यश्चेत् शिरसिव्रणः चंद्रश्चेन्मुखे भौमश्चेत्कंठे बुधश्चेद्धृदये वाक्पतिश्चेन्नाभिमूलेव्रणाः स्युः ॥ १७ ॥

अर्थ.—षष्ठाधिपति पापग्रहांनीं युक्त असून लग्नीं किंवा अष्टमस्थानीं असेल तर त्या मनुष्याचे शरीरास व्रण होतील. याचप्रमाणें लग्न, चंद्र, कारक, भावकुंडलींत असा योग

असेल तर त्या त्या भावांस व्रण सांगावे. तो षष्ठेश रवि असून लग्नीं किंवा अष्टमस्थानीं पापग्रहानीं युक्त असेल तर मस्तकावर, तो षष्ठेश चंद्र असेल तर मुखांत, षष्ठेश मंगळ असेल तर कंठांत, बुध असेल तर हृदयांत, गुरु असेल तर नाभीवर व्रण सांगावा.

नेत्रपीडा योग.

नेत्रेपृष्ठेचशुक्रोदिनकरतनयःस्यात्पदेचाधरेचेत् ॥
केतुर्वासैंहिकेयस्तदनुतनुपतिर्भौमवित्क्षेत्रसंस्थः ॥
आभ्यामालोकितःसन्भवतिहिकतिचित्स्थानगोवातदानीं
नेत्रेरोगीनरःस्यात्प्रवरमतियुतैर्होरिकैर्ज्ञेयमेवम् ॥ १८ ॥

टीका.—शुक्रश्चेन्नेत्रमूलेपृष्ठेच शनिश्चेत्पदेचरणेराहुः केतुर्वाअधरेव्रणाः स्युः इति पूर्वश्लोकेनान्वयः अथनेत्रव्याधियोगः तदनुभौमबुधराशिस्थोलग्नेशः भौमबुधदृष्टः कतिचित् स्थानगोपि वा यत्रकुत्रवास्यात्तदानींजातः नेत्ररोगीस्यात् प्रवरमतियुतैर्होरिकैरेवंज्ञेयं ॥ १८ ॥

अर्थ.—शुक्र असेल तर नेत्रावर, शनि असेल तर पायांवर, राहु केतु असतील तर ओष्ठावर व्रण होईल. लग्नेश, मंगळ किंवा बुध क्षेत्रींचा असून त्यास बुध मंगळ पहात असतील आणि लग्नेश कोठेंही असला तरी तो मनुष्य नेत्ररोगी होईल. हे सर्व त्यास अनुभूत होतात दशावस्था नको.

याप्रकारें करून होरा शास्त्रवेत्यांनीं प्रत्येक भावीं विचार करावा.

षष्ठभाव योग.

षष्ठेशेलग्नयातेभवतिहिमनुजोवैरिहंताधनस्थे ॥
पुत्रात्तार्थोतिदुष्टःसहजभवनगेग्रामदुःखाकरःस्यात् ॥
नाभिस्थानेचरोगीतनुनिधनपतीशत्रुभावस्थितौना ॥
नेत्रेवामेतरेस्यादसुरकुलगुरुःसूर्यसस्त्वंघ्रिरोगी ॥ १९ ॥

टीका.—अथान्ययोगः षष्ठभावाधिपेलग्नस्थेजातः शत्रुहंतास्यात् धनस्थेषष्ठेशे-पुत्रात्तार्थः पुत्रेणात्तः गृहीतः अर्थोधनंयस्यसपुत्रहृतधनइत्यर्थः अतिदुष्टश्चस्यात् सहज भवनगेग्रामस्यदुःखकरः नाभौरोगीचस्यात् लग्नाष्टमपतीषष्ठस्थौनापुरुषः नेत्ररोगी-स्यात् अग्रेवामेतरशब्दोपादानात् अत्रवामइतिगम्यते शुक्रः षष्ठेऽष्टमेइतरे दक्षिणनेत्र-रोगी शनिः षष्ठेचरणरोगीस्यात् ॥ १९ ॥

अर्थ—षष्ठाधिपति लग्नीं असेल तर तो मनुष्य शत्रूला मारणारा होतो. जो ग्रह स्वराशी॰ पासून अष्टम स्थानांत पडेल त्या ग्रहाची राशि ज्या भावीं असेल त्या भावाचा नाश सांगावा. षष्ठ स्थानचा अधिपति धनस्थानांत पडेल तर पुत्रापासून द्रव्यप्राप्ति होईल. व स्वभावानें अतिदुष्ट होईल. कोणतेही भावापासून द्वितीयाधिपति ज्या भावीं पडेल त्या भावापासून द्रव्यप्राप्ति सांगावी. षष्ठेश तृतीय स्थानीं पडेल तर सर्व लोकांस दुःख देणार होईल व नाभिस्थानीं रोगी होईल. लग्नाधिपति व अष्टमाधिपति षष्ठस्थानीं असेल तर डाव्या डोळ्याला रोग होईल. नुसता शुक्र षष्ठांत किंवा अष्टमांत असेल तर उजव्या डोळ्यास रोग होईल. नुसता शनि षष्ठस्थानीं असेल तर चरण रोगी होईल. प्रत्येक भावीं योगावर फलकल्पना करावी.

षष्ठभावयोग.

दंतेदंतच्छदेवाकुमुदपातिरिपुःसंस्थितःषष्ठभावे ॥
केतुर्वालग्ननाथःकुजबुधभवनेसंस्थितःक्वापिदृष्टः ॥
स्वेनप्रत्यर्थिनावाभवतिजनुषिचेदासनार्धेसरोगः ॥
तौभूमीसूर्यपुत्रौयदिरिपुगृहगौतद्भवःस्याद्गदोनुः ॥२०॥

ठीका.—अथान्ययोगः राहुकेतू शत्रुभावेचेद्दंतेदंतच्छदे ओष्ठेवा रोगीस्यात् भौमबुधराशिस्थितोलग्नेशः स्वेनस्वशत्रुणा पूर्णदृष्टः यत्रकुत्रापिस्यात्तदा आसनार्धे गुदसमीपे वा रोगीस्यात् यदितौ भूमीसूर्यपुत्रौ रिपुगृहगौषष्ठभावसंस्थौ चेत्तदातद्भवः नुः पुरुषस्यगदो रोगः स्यात् ॥ २० ॥

अर्थ.—राहु केतु षष्ठांत असतील तर दंतरोगी किंवा ओष्ठरोगी होईल. लग्नाधिपति, मंगळ किंवा बुध भवनीं असून किंवा कोणतेही भावीं असून त्याचा शत्रु त्यास पहात असेल तर ढुंगणाजवळ रोग होईल. मंगळ किंवा बुध लग्नेश असतील हा योग होत नाहीं. भौम आणि शनि षष्ठस्थानीं असतील तर त्या मनुष्यास सदा उष्णवात, पित्तवात, रक्तवात असे रोग होतात.

षष्ठभावयोग.

प्रालेयांशौरिपुस्थेखलखगसहितेमानवोरोगवान्स्यात् ॥
क्रूरैर्निष्पीडितश्चेत्तनुसदनगतःशीतरश्मिस्तदानीं ॥
क्रूरेकेंद्रालयस्थेयदिशुभविहगैर्नेक्षितेरोगवान्स्यात्
तस्मिन्काव्यालयस्थेकुजगुरुकविभिर्नेक्षितेतद्वदेव ॥२१

टीका—तथा प्रालेयांशौचंद्रेखगसहिते पापग्रहयुक्ते शत्रुभावस्थेसतिरोगवान्

स्यात् क्रूरैर्निष्पीडिते शनिप्रभृतिभिः क्रूरग्रहैः योगेन दृष्ट्यावापीडिते तनु सदन-गतेलग्नगेतस्मिन् शीतकरे चंद्रेतद्वान् रोगीस्यात् शुभग्रहदृष्टिरहितः केंद्रगः क्रूरश्चेद्रो-गवान् स्यात् तस्मिन् क्रूरेशुक्रराशिसंस्थे कुजशुक्रगुरुभिर्नदृष्टे तद्वदेव रोगवानेवस्यात् अत्रयद्यपि विशेषोनोक्तस्तथापियोगकर्तृगृहस्वामिकफवात पित्तादिकोपजन्यो विशे-षरोगोज्ञेयः ॥ २१ ॥

अर्थ.—चंद्रमा पापग्रहांनीं युक्त होऊन षष्ठस्थानीं असेल तर तो मनुष्य रोगी होईल. तो चंद्र पापग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट लग्नीं असेल तर तो मनुष्य रोगी होईल. केंद्रीं पाप-ग्रह असून तो शुभ ग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट नसेल तर तो रोगी होईल. केंद्रीं पापग्रह शुक्र राशीस असून त्यास मंगळ, गुरु, शुक्र हे पहात नसतील तर तो मनुष्य शुक्र रोगी होईल.

षष्ठभाव योग.

पुंलग्नेस्वोच्चयुतंगेरिपुभवनपतौवीक्षितेसन्नभोगैः ॥
अंगेनूनंनराणामरिजनवशतःस्याद्गदोगूढरूपः ॥
रिःफस्थानेस्थितेचेदरिसदनपतौसिंहिकात्रयुक्ते ॥
किंवासप्ताश्वयुक्तेपरगृहवसतिर्नीचवृत्तिर्नरःस्यात्॥२२॥

टीका.—षष्ठेशेपुंराशिलग्नेस्वोच्चेवापापग्रहैर्दृष्टेसतिनराणां जातानां अंगेशरीरे अरिजनवशतः शत्रुजनकारितः गूढरूपः प्रच्छन्नः गदोरोगः स्यात् अत्रग्रहतुंगराशी-नांप्रायः स्त्रीराशित्वात् पुंलग्नेवाशब्दप्रयोगेभिन्नएवयोगोज्ञायते षष्ठेशो राहुयुक्तः यद्वासूर्ययुक्तः द्वादशेवास्थितः तदाजातः नरः परगृहवासीनीचवृत्तिश्चस्यात् ॥२२॥

अर्थ.—लग्न पुरुष राशीचें असून षष्ठाधिपति उच्च राशीस असून पापग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तर शत्रूच्या उपद्रवानें शरीरास गुप्तरोग होईल. सिंहराशीचा रवि षष्ठेश अ-सेल तर शत्रूपासून गुप्तरोग सांगावा. द्वादशस्थानीं षष्ठाधिपति राहूनें किंवा सूर्यानें युक्त असेल तर दुसऱ्याचे घरांत राहून नीच वृत्ति करणारा होईल. हे योग कोणते लग्नीं घड-तात हें पहावें.

सप्तमभावफळें.

यावंतोवाविहंगामदनसदनगाश्चेन्निजाधीशदृष्टाः ॥
तावंतोनुर्विवाहास्त्वथसुमतिमताज्ञेयमित्थंकुटुंबे ॥
कार्योहोरागमज्ञैरधिकबलवतांखेचराणांहियोगात् ॥
आदेश्यंतत्रवीर्यैरविविधुकुभुवामंगादिकृशीलसंख्यं ॥ २३

टीका–अथ सप्तमभावफलं निरूपयिष्यन् विवाहयोगमाह यावंतोग्रहाः सप्तमस्थाः सप्तमेशेनदृष्टाः तावंतोविवाहाः नुः पुरुषस्यः ज्ञेयाः सुमतिमता जन्मलग्नाभिज्ञेनदैवज्ञेन एवमुक्तप्रकारेण कुटुंबे जनकभ्रात्रादौज्ञेयं होरागमज्ञैर्जातकशास्त्रविद्भिरधिकबलवतां ग्रहाणामेव योगादिचारः कार्यः तत्राधिकबलं रविविधुकुभुवां रवि सूर्य चंद्रभौमानां अंगदिक् शैलसंख्यमादेश्यं सूर्यस्यषट्रूपाणि चंद्रस्यदशरूपाणि भौमस्यसप्तरूपाणि अन्येषांषट्रूपाण्येव अंगरूपाधिकोबलीतिपद्धतिवचनात् ॥ २३ ॥

अर्थ–लग्नापासून सप्तमस्थानांत जितके ग्रह असतील आणि त्यांस सप्तमेश पहात असेल किंवा सप्तमेश सप्तमस्थानांतच असेल तर त्या मनुष्याचे तितके विवाह होतील. याप्रमाणें द्वादश भावांविषयीं जाणावें. ते विवाहकारक गह रवि, चंद्र, मंगळ पूर्णबली असतील तर क्रमें करून सहा, दहा व सात विवाह सांगावे. बाकीचे ग्रहांस सहा विवाह सांगावे. ते ग्रह निर्बल असतील तर प्रत्येकास एक एक विवाह सांगावा.

विवाहयोग.

केंद्रस्थावात्रिकोणेयदिखलुगृहिणीकारकास्यानभोगाः॥
कामार्थेशौनिजेक्षेपरिणयनविधिःस्यात्तदानींनुरेकः ॥
जायाधीशःकुटुंबाधिपतिरपियुतश्चेत्रिकेगर्हितारव्यैः ॥
यावद्भिःशुक्रयुक्तोनियतमिहभवेत्तावतीनांविरामः ॥२४॥

टीका–गृहिणीकारकाः सप्तमभावेशुभग्रहाः शुक्रेंदु जीवशशिजैः सकलैस्त्रिभिर्वाद्वाभ्यांकलत्र भवनेच तथैककेन एषांगृहेपिच गणेपि विलोकितेवासंति स्त्रियोमदनभावपति स्वभावाइति कल्याण वर्मवचनात् एतेकेंद्रस्थाः वात्रिकोणेस्युः तथासप्तमद्वितीयपतीस्वभवनेस्यातां तदाजातस्यनुः पुरुषस्यपरिणयनविधिः विवाहएकःस्यात् सप्तमभावाधीशः द्वितीयाधिपोवाशुक्रयुक्तः यावद्भिःक्रूरग्रहैर्दृष्टःसहितःत्रिकेस्यात् तावतीनां स्त्रीणांविरामोनाशःस्यात् ॥ २४ ॥

अर्थ.—विवाहकारक ग्रह शुभ असतील तर किंवा सप्तमस्थानाचा स्वामी शुभग्रहाच्या राशीस असून शुभग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तर स्त्री उत्तम स्वभावाची मिळेल. पापग्रहांच्या राशीस सप्तमेश असून पापग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तर वाईट स्वभावाची स्त्री प्राप्त होईल. सप्तमाधिपति सप्तमांत व द्वितीयाधिपति द्वितीयस्थानांत असेल तर त्या मनुष्याचा एकच विवाह होईल. सप्तमाधिपति किंवा द्वितीयाधिपति शुक्रानें युक्त असून जितक्या पापग्रहांनीं युक्त असून षष्ठ, अष्टम, व द्वादश या स्थानीं किंवा शुक्र पापयुक्त त्रिकांत असेल तर तितक्या स्त्रिया मरतील.

स्त्रीलागर्भ न राहण्याचे योग.

लग्नस्थेसप्तसप्तौदिनमणितनयेकामगेचार्कमंदौ ॥

द्यूनेचंद्रेनभस्थेनचयदिगुरुणालोकितेनोप्रसूते ॥
द्वेष्येशोमित्रमंदौद्विषिसितकिरणेऽस्तेबुधेनेक्षितेनो ॥
सूतेद्वेष्येजलर्क्षेयदिकुजरविजौगर्भिणीस्यान्ननारी ॥२५॥

टीका—अथ गर्भाभावयोगानाह सप्तसप्तौसूर्येलग्नस्थे शनौ सप्तमस्थे एकोयोगः अथसूर्यशनीसप्तमेगुरुदृष्टिरहितश्चंद्रो दशमे इतिद्वितीयोयोगः अत्रनारी नोप्रसूते द्वेष्येशः शत्रुभवनस्वामी तथामित्र मंदौ रविशनीचद्विषिषष्ठे बुधेनदृष्टः सितकिरणश्चंद्रोऽस्ते सप्तमे अयं तृतीयोयोगः अत्रनारी नोप्रसूते कुजशनीषष्ठे चतुर्थेयदितदा जातस्य नारी गर्भिणीनस्यादिति चतुर्थोयोगः इतिसप्तमभावः ॥ २५ ॥

अर्थ.–लग्नीं सूर्य व सप्तमांत शनि, सूर्य व शनि हे दोघे सप्तमांत आणि चंद्रमा दशमस्थानीं असून त्यास गुरु पहात नसेल तर त्याची स्त्री कधींच प्रसूत होणार नाहीं. ' अशा मनुष्यानें कितीही बायका केल्या तरी त्यास संतति होणार नाहीं. ' षष्ठेश, रवि आणि शनि हे षष्ठांत, सप्तमांत चंद्रमा असून त्या चंद्रास बुध पहात असेल तर. अथवा मंगळ, शनि षष्ठांत किंवा चतुर्थस्थानीं असेल तर त्या पुरुषाची स्त्री गर्भिणीच होणार नाहीं. षष्ठस्थान जलराशीचें असून तेथें वर सांगितलेले ग्रह असतील तरी ही स्त्री गर्भिणी होणार नाहीं. प्रत्येक भावीं पाहावें.

अष्टमभाव फळें.

रंध्रस्थानस्थितावास्थिरभवनगताःशुक्रवागीशसौम्याः ॥
कृच्छ्राणांकर्मणांनाभवतिहिनियतंकारकस्तब्धभावः ॥
बाल्येदुःखीनरःस्यान्निधनगृहपतौलाभयातेसुखीस्यात् ॥
पश्चात्पापेऽल्पमायुःशुभखगसहितेदीर्घमायुर्नराणाम् २६

टीका.—अथाष्टमभावः कष्टकर्मकरादियोगमाह शुक्रगुरुबुधाः अष्टमस्थाः स्थिरराशिगताः वा तदाजातः नापुरुषः नियतं नियमेन कष्टकर्मणां कर्तास्यात् स्तब्धभावः कठिनचित्तश्चस्यात् अष्टमभावेशेलाभगे बाल्ये बाल्यावस्थायां दुःखीपश्चात्सुखीस्यात् लाभगेऽष्टमेशे पापे अल्पायुःस्यात् तस्मिन्नेवशुभग्रहयुक्ते जातानांदीर्घमायुः स्यात् ॥ २६ ॥

अर्थ.–अष्टमस्थानीं स्थिरराशीस गुरु, शुक्र, बुध यांपैकीं कोणीही असेल तर तो मनुष्य निरंतर मोठमाठालीं कष्टाचीं कामें करणारा होतो. आणि हिय्याचा (धीराचा) होतो. अष्टमाधिपति एकादशस्थानीं असेल तर बाल्यावस्थेंत दुःखी होऊन नंतर सुखी होतो. तो अष्टमेश पापग्रह असेल तर तो मनुष्य अल्पायु होतो. आणि तो शुभग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तर दीर्घायु होतो.

आयुष्य योग.

कुर्यादायुर्गृहेशःखलखगयुगरिप्रांत्यसंस्थोऽल्पमायुः ॥
चेल्लग्नाधीशयुक्तोनिधनभवनपःस्वल्पमायुःप्रदत्ते ॥
रंध्रस्थोवाचिरायुस्तदनुरविभुवस्तत्रतद्वल्लयेशो ॥
क्लेशस्थानस्थितश्चेज्जनुषिहिमनुजोवैरियुक्तस्करःस्यात् २७

टीका.—आयुर्गृहेशः अष्टमपतिः क्रूरयुक्तः षष्ठद्वादशगतः तदाल्पमायुःकुर्यात् अष्टमपतिः लग्नेशयुक्तः अरिप्रांत्यसंस्थः इत्यनुषंगः तदास्वल्पमायुः प्रदत्ते अष्टमेशः तदनुरविभुवो वा तत्राष्टमे तद्वत्चिरायुः प्रदत्ते लयेशः अष्टमेशः कोशस्थानस्थितः द्वितीयेस्थितश्चेत्तदा तस्करोवैरियुक्तश्चस्यात् ॥ २७ ॥

अर्थ.—अष्टमाधिपति पापग्रहांनीं युक्त असून षष्ठस्थानांत किंवा द्वादशस्थानांत असेल तर अल्पायु होतो. तो अष्टमेश लग्नेशानें युक्त असून षष्ठ, द्वादशस्थानीं असेल तरी ही अल्पायु होतो. अष्टमेश अष्टमस्थानांत असेल तर चिरायु होतो. नुसता शनि अष्टमस्थानांत असेल तर चिरायु होतो. अष्टमाधिपति षष्ठस्थानी असेल तर तो मनुष्य चोर आणि सर्व लोकांचा शत्रु होतो.

जयप्राप्ति योग.

आयुर्देहाधिनाथौनिधनरिपुगतौहीनवीर्यौप्रसूतौ ॥
संग्रामेकीर्तिशेषंव्रजतिबलयुतौतौतदातज्जयाप्तिं ॥
शुक्रेणांदोलिकायास्तनुपविधियुतोवाहनस्थाननाथो ॥
मूर्तौदंतावलेंद्रैरथगुरुसहितःस्याज्जयोगंधवाहैः ॥२८॥

टीका.—प्रसूतौजन्मसमये आयुर्देहाधिनाथौ अष्टमलग्नपती हीनवीर्यौ अष्टम षष्ठगतौ तदासंग्रामे कीर्तिशेषं प्राप्नोति संग्रामाभिमुखोयुद्धं विहाय पंचत्वंप्राप्नोतीत्यर्थः तावेवायुर्देहाधिनाथौसबलौचेद्विजयी भवति चतुर्थेशः शुक्रेणयुतश्चेत् आंदोलिकायाः शिबिकायाः जयः शिबिकारूढो जयतीत्यर्थःचतुर्थेशः लग्नेशेन चंद्रेणचयुतः मूर्तौ लग्नेस्थितश्चेत्तदा दंतावलेंद्रैः महागजैः जयःस्यात् अथचतुर्थेशोगुरुयुतः लग्नेचेत्तदावाजिवाहैः वाजिराजैः गजेंद्रैश्चसहजयःस्यात् इत्यष्टमभावः ॥ २८ ॥

अर्थ—अष्टमाधिपति व लग्नाधिपति बळहीन होऊन षष्ठस्थानांत किंवा अष्टमस्थानांत असतील तर तो मनुष्य लढाईत मरतो. किंवा अष्टमाधिपति अष्टमस्थानांत व लग्नाधिपति लग्नांत हीनबली असेल तर वरप्रमाणेंच योग होतो. आणि तेच ग्रह बळवान् असतील तर

संग्रामात जय मिळेल. त्या ग्रहांपैकीं शुक्र असून बली असेल तर पालखींत बसून जय मिळतो. चतुर्थस्थानाधिपति व लग्नेश चंद्रानें युक्त असून लग्नीं असतील तर व अष्टमेश अष्टमस्थानांत असेल तर हत्तीवर बसून जय मिळतो. चतुर्थाधिपति, लग्नेश, चंद्र व गुरु हे लग्नांत असतील तर तो मनुष्य घोड्यावर बसून जय मिळवील. हे योग राजकुल किंवा क्षत्रिय लोकांस मिळतात.

नवमभावफळें.

भाग्येशोमूर्तिवर्तीसुरपतिगुरुणालोकितोभूपवंद्यो ॥
लग्नस्थोवाहनेशोनवमपतिरुभौपश्यतश्चेत्स्वगेहं ॥
सर्वासामास्पदंस्यान्मनुजइहतदासंपदांवाहनेंद्रो ॥
रंध्रस्थानस्थितश्चेद्व्रजतिहिमनुजोभाग्यराहित्यमेव॥२९

टीका–अथनवमभावः शुभयोगमाह नवमभावेशोगुरुदृष्टः लग्नस्थश्चेत्तत्रजातोराजवंद्यः राजमान्यःस्यात् भाग्येशः नवमाधिपः लग्नस्थः चतुर्थनवमपतीस्वभवनं चतुर्थपतिः चतुर्थं नवमपतिर्नवमं पूर्णदृष्ट्या पश्यतश्चेत्तदासर्वासांधनधान्यसुवर्णादिसंपदां आस्पदंआश्रयः मनुजःस्यात् वाहनेशः अष्टमस्थस्तदामनुजः भाग्यराहित्यंव्रजति होराविद्भिरेवंप्रकारेण भाग्यराहित्येनुः हीनानांशुभलक्षण वयोबलादिरहितानांप्राप्तिस्तदनु चपलता स्थिरता च ज्ञेयेत्यग्रिमेणसंबंधः ॥ २९ ॥

अर्थ–भाग्येश लग्नांत असून त्यास बृहस्पति पहात असेल तर तो पुरुष राजवंद्य होतो. तो भाग्येश निर्बल असेल तर विद्येनें राजवंद्य होतो. बली असेल तर तरवारीचे शौर्यानें राजवंद्य होतो. नवमेश आणि गुरु लग्नीं व चतुर्थेश चतर्थस्थानाला पहात असेल तर सर्व संपत्ति प्राप्त होते. चतुर्थाधिपति अष्टमस्थानीं असेल तर भाग्यहीन होतो.

नवमभावफळें.

हीनानांवाहनानांतदनुचपलताप्राप्तिरेवंनराणां ॥
ज्ञेयाहोरागमज्ञैरथनवमपतौलाभगेराजवंद्यः ॥
दीर्घायुर्धर्मशीलस्तदनुधनवपुर्वाहनेशाःस्वगेहे ॥
धर्मेशोलग्नवर्तीजनुषियदिगजस्वामिसिंहासनानाम् ३०

टीका.—अथनवमेशोलाभगेराजमान्यः दीर्घायुर्धर्मशीलश्चस्यात् तदनुजनुषि धनवपुर्वाहनेशाः द्वितीय लग्न चतुर्थ पतयः स्वगेहे लग्नेशो लग्नेधनेशो धने वाहनेशो

वाहनभवनेइत्यर्थः धर्मेशोलग्नगतोयदितदागजस्वामि सिंहासनानांप्राप्तिरित्यनुषंगः तत्रगजाः हस्तिनः स्वामिसिंहासनानांराजाधिष्ठेयसिंहासनं राज्यकार्येषु भद्रासनं तेषां प्राप्तिः स्यात् ॥ ३० ॥

अर्थ.—आणि तो चतुर्थेशबली असेल तर वाईट वाहनें मिळतील. नवमाधिपति एकादशस्थानीं असेल तर राजमान्य, दीर्घायु व धर्मशील होतो. धनाधिपति धनांत, लग्नाधिपति लग्नांत व चतुर्थाधिपति चतुर्थांत व नवमाधिपति ही लग्नांत असेल तर हत्ती, घोडे, सिंहासनें प्राप्त होतात.

नवमभावफळें.

योगानांस्यादमीषांप्रचुरबलयुतोयोऽधिपस्तद्दशाया ॥
लब्धिश्चांतर्दशायामथगुरुभृगुजौवाहनाधीशयुक्तौ ॥
केंद्रेयानेत्रिकोणेत्वथगुरुकवियुग्वाहनस्थानगोवा ॥
भाग्याधीशःस्वराशौभवतिनरपतिर्वाहनव्यूहनाथः ३१

टीका.—अमीषामुक्तवक्ष्यमाणानांयोगानांयोधिपः योगकर्तायोग्रहः अधिकबलयुतस्तस्यदशायां अंतर्दशायांलब्धिः योगफललाभःस्यात् अथगुरुशुक्रौवाहनेशयुतौ संतौ केंद्रे अयाने आगमेएकादशेइत्यर्थः त्रिकोणेस्याताभित्येकोयोगः अथगुरुशुक्रयुतोभाग्याधीशः भाग्ये चतुर्थे वास्यात्तदाद्वितीयोयोगः अत्रयोगद्वयेजातः वाहनव्यूहानांसमुदायानांनाथः ईशोनरपतिः स्यात् ॥ ३१ ॥

अर्थ.—पूर्वी सांगितलेले योग कारकग्रहांमध्यें जे ग्रह अधिक बली असतील त्यांच्या दशा अंतर्दशेंत फल प्राप्ति होईल. गुरु शुक्र व चतुर्थेश हे केंद्रीं किंवा एकादशस्थानीं किंवा त्रिकोणांत, गुरु शुक्र युक्त नवमस्थानाधिपति चतुर्थस्थानांत किंवा नवमस्थानात असतील तर वाहन समूहाचा मालक होतो. ग्रहबलानें फल न्यूनाधिक होतें.

चिंतायोग, व दशमभाव फळें.

कर्मस्थेक्षेत्रचिंतात्रिकभवनगतेसौख्यचिंतामहीजे ॥
वागीशेयानभूषावसनहयभवाचामरच्छत्रचिंता ॥
प्रालेयांशौसितेस्यादथमदनगतेवाक्पतौपुत्रचिंता ॥
संस्थानस्थानयातेहिमकरतनयेबुद्धिजास्यात्रिकोणे॥३२
मार्तंडेतातबंधोरथसुतनवमद्यूनगेदानवेज्ये ॥
यात्राचिंतानराणामथनवमसुतेपुत्रजावासवेज्ये ॥

कर्माधीशोविवीर्योयदिजनुषितदासर्वकर्मास्पदंनो ॥
गेहेस्वीयेयदासौशुभविहगयुतोमानवोमानशीलः ॥३३॥

टीका.—अथचिंतायोगाः भौमेकर्मस्थेक्षेत्रचिंता कर्षणबीजावापक्षेत्रसंस्कारादिप्रकारकक्षेत्रचिंताऽइत्यर्थः त्रिकभवनगते षष्ठाष्टमद्वादशे महीजे सौख्यचिंता सकलविषयप्रयुक्तसौख्यचिंतास्यादित्यर्थः वागीशेत्रिकस्थेवाहनभूषण वस्त्राश्वभवाचिंतास्यात् चंद्रेसितेवात्रिकस्थेचामरच्छत्रचिंतातत्प्राप्तौरक्षणेच चिंतास्यात् अथवाक्पतौगुरौसप्तमस्थेपुत्रचिंतापुत्रविषयकगोरक्षणादिचिंतेत्यर्थः बुधेपंचमेबुद्धिजाचिंतासूर्येत्रिकोणस्थेपितुर्बांधवस्यचचिंता शुक्रेसुत नवमसप्तमगेयात्राचिंता अथगुरौनवमपंचगेपुत्रजापुत्रभवाचिंतास्यात् चिंतानामयेषांजनानां क्षेत्रादिसंभवस्तेषां तद्विषयलाभाशुभानुकूल्य प्रातिकूल्यादिसंस्मृतिः इतिनवमभावः ३२ अथदशमभावफलमर्धेनाह जनुषिकर्मभावेशोविवीर्योनिर्बलश्चेत्तदाजातः सर्वकर्मास्पदंसर्वकर्मणामास्पदंस्थानं नोसर्वकर्मसाधकोनस्यात् अर्थात्तुजनुषिकर्माधीशोबलीचेत्सर्वाणिसाधयेज्जातइत्यर्थः यदाशुभग्रहयुतो दशमाधीशः स्वीयगेहेदशमेचेत्तदाजातोमानवो मानशीलो मानीभवेत् ॥ ३३ ॥

अर्थ.—मंगळ दशमस्थानीं असेल तर क्षेत्रचिंता त्या मनुष्यास लागेल. षष्ठ, अष्टम, द्वादश या स्थानीं मंगळ असेल तर सौख्यचिंता होईल. तसाच गुरु षष्ठ, अष्टम, द्वादश या स्थानीं असेल तर वाहन, भूषण, वस्त्र याची चिंता होईल. चंद्र किंवा शुक्र षष्ठ, अष्टम, द्वादश या स्थानीं असेल तर छत्रचामराची चिंता होईल. सप्तमस्थानीं गुरु असेल तर पुत्रचिंता, पंचमस्थानीं बुध असेल तर बुद्धिचिंता होईल. ३२ त्रिकोणांत किंवा एकादशांत रवि असेल तर पितृपक्षाकडील मनुष्याची चिंता होईल. पंचम, नवम, सप्तम या स्थानीं शुक्र असेल तर यात्राचिंता होईल. गुरु नवम, पंचमस्थानीं असेल तर पुत्रचिंता होईल, दशमस्थानाचाअधिपति निर्बल असेल तर कांहीं सुख होत नाहीं. व तो दशमेश निर्बल असून स्वराशीस शुभ ग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तर तो मनुष्य मानी होतो.३३

आयुष्य योग.

लाभेकेंद्रेत्रिकोणेतनुनिधनभवस्थानपाःसंस्थिताश्चेत् ॥
दीर्घायुःपापखेटाःपणफरहिबुकत्रिस्थितामध्यमायुः ॥
हीनायुःप्रोक्तमेतेयदिजनुषिनृणांस्युस्तदापोक्लिमस्था ॥
रंध्रस्थानस्थितानांतनुपतिगगनस्वामिसूर्यात्मजानां३४
योहीनस्तद्दशायुस्त्वथनिजभवनेधर्मकर्मात्मजेशाः ॥
चेत्स्युस्तेषांदशायांबहुलबलवशाद्धर्मबुद्धिर्नराणां ॥

**हानिःस्यादन्यथारौतनुविधनपतीभानुपुत्रेणयुक्तौ ॥
स्यातांस्वर्भानुनाचेत्तदनुचशिखिनातद्दशायांव्रणाःस्युः ३५**

टीका.—अथदीर्घमध्याययोगानाह यदानृणांजन्मसमये लग्नाष्टमैकादशेशाः लाभेकेंद्रत्रिकोणेचस्थिताश्चेद्दीर्घायुः स्यात् पापग्रहाः फणफर चतुर्थ तृतीयस्थिताः मध्यमायुःस्यात् एतेपूर्वोक्ताआपोक्लिमस्थाश्चेदल्पायुः स्यात् द्वात्रिंशद्वर्षादर्वाक्हीनायुः ततोमध्यायुः चतुःषष्ठ्यनंतरं दीर्घायुर्ज्ञेयं लग्नेशदशमेशशनीनां अष्टमस्थानस्थितानांमध्येयोहीनः हीनबलस्तस्यदशापर्यंतमायुः स्यादित्युत्तरेणसंबंधः ॥ ३४ ॥ अथधर्मकर्मात्मजेशाः नवमदशमपंचमेशाः स्वभवनेनवमादिकेस्युस्तदातेषांयोधिकबलस्तस्यदशायांजातस्यधर्मबुद्धिःस्यात् अन्यथा परभवनेयदातेषांयोधिकबलस्तद्दशायांधर्महानिः स्यादित्यर्थः लग्नाष्टमपतीयदिशनिराहुकेतूनामन्यतमेनयुतौषष्ठस्थौतद्दशायां तनुनिधनपत्योरधिकबलस्यदशायांव्रणाः स्युः ॥ ३५ ॥

अर्थ.—एकादशस्थानांत, केंद्रांत (प्रथम चतुर्थ सप्तम दशम) किंवा त्रिकोणांत (पंचम नवम) लग्न, अष्टम व एकादश या स्थानांचे स्वामी असतील तर तो दीर्घायु होतो. पापग्रह पणफर (द्वितीय; पंचम, अष्टम, एकादश) स्थानी. चतुर्थ तृतीयस्थानीं असतील तर मध्यायु होतो. पापग्रह आपोक्लिमांत (तृतीय, षष्ठ, नवम, द्वादश) असतील तर अल्पायुषी होतो. अष्टमस्थानांत असणारे ग्रह, लग्नेश, दशमेश आणि शनि यामध्यें ३४ जो निर्बल त्या ग्रहाच महादशा अंतर्दशापर्यंत आयुर्दाय सांगावा. स्वक्षेत्रींचे, नवमेश, दशमेश व पंचमेश असून त्यांत जो अधिक बली त्याचे दशेंत धर्म बुद्धि सांगावी. तेच ग्रह इतर राशीस असतील तर त्यांचे दशेंत धर्म हानि होईल. लग्नेश व अष्टमेश हे शनि, राहु किंवा केतु यांनीं युक्त असून षष्ठस्थानीं असतील तर व लग्नेश, अष्टमेश यांत जो निर्बल असेल त्याचे दशेंत शरीरास व्रण सांगावे. आयुष्यमान कोष्टक पुढें आहे.

मरण योग.

**यानेशस्तत्रसंस्थोयदिभवतितदायानहेतुर्मृतिःस्यात् ॥
चोराच्छस्त्रेणचिंतानवमभवनतोभाग्यजाताविधेया ॥
व्योम्नोभूपालभूषावसनहयमहत्कर्मणांप्राप्तिचिंता ॥
लाभस्थानेऽखिलानांव्ययनिधनगृहात्कल्मषाणांविधेया ३६**

टीका.—चतुर्थेशस्तत्रषष्ठभावेचेत्तदायानहेतुमृतिःस्यात् चौराच्छस्त्रेणचमृतिः तत्रेति अरिभावपरामर्शेनयानेशस्य शन्यादियोगेवक्ष्यते अयमर्थः शनियोगेयानहेतो मृतिः राहुयोगेचोरान्मृतिः केतुयोगेशस्त्रेणमृतिः अथसंक्षेपादुक्तानांनवमादिभावानां सामान्यचिंतालंबनंउच्यते नवमभावतोभाग्यजाताचिंताविधेयाअयंभावः भाग्येयो-

ग्रहः भाग्येशोयोग्रहः भाग्यभवनस्थोयोराशिः तव्द्यापारोकेंद्रग्रहाभाग्यभवनेशुभाशुभवर्गविवेकः भाग्यभाग्येशबलाबलत्वमित्यादि विचार्य जातकशास्त्रविचारंपरिभूय सुध्याफलंवक्तव्यं तथाभिहितं कल्याणवर्मणा भाग्यर्क्षपतिः कस्मिकोत्राभाग्यर्क्षमाश्रितोविहगः बलवान्मध्येऽबलोवाइत्यादि तत्रान्यत्र भाग्येबलिष्ठेयादिमेषराशौचतुःपदोत्थं प्रकारोतिधर्मं वृषे बलिष्ठेबहुधेनुदायी युग्मेतथाब्राम्हणभोज्यदाता स्यात्कर्कटेतीर्थपरश्चसिंहेजातोमनुष्यः परधर्मनिष्ठः यदृष्टिधर्मामनुजोयुवत्यांप्रसिद्धधर्मातुलजोमनुष्यः ॥ ३६ ॥

अर्थ.—चतुर्थेश षष्ठस्थानांत असेल तर यानापासून (गाडीवरून, वाहनावरून) पडून मरेल. तो चतुर्थेश शनीनें युक्त षष्ठस्थानांत असेल तरी ही यानापासून मरेल. चतुर्थेश षष्ठांत राहूनें युक्त असेल तर चोरापासून व केतूनें युक्त असेल तर शस्त्रापासून मृत्यु सांगावा. नवमस्थानापासून भाग्यचिंता सांगावी. दशमभावापासून राज्य, अलंकार, वस्त्र, मान, यांचे विचार करावे. एकादशस्थानीं सर्व वस्तुलाभाचा विचार करावा. द्वादशस्थानीं व अष्टमस्थानीं पापाचा विचार करावा. ॥ ३६ ॥

द्वादशभाव फळें.

लग्नस्थेरिःफनाथेभवतिसुवचनोमानवोरूपवान्वा ॥
स्वर्क्षेकार्पण्यबुद्धिर्बहुतरपशुमान्ग्रामयुक्तःसदास्यात् ॥
धर्मेतीर्थावलोकीबहुलवृषमतिःक्रूरयुक्तेचपापी ॥
मिथ्याकोशांतकृत्स्यान्नियतमिदमतीज्ञेयमेवंसुधीभिः ३७

टीका.--द्वादशभावाधिपेलग्नस्थेसतिमानवः सुवचनः सुवाङ्माधुर्योरूपवान्वा भवति तथास्वर्क्षेस्वगृहेसति कृपणबुद्धिः अनेकपशुयुक्तोग्रामयुक्तश्चग्रामाधिकारयुक्तश्चस्यात् तथाधर्मेनवमेसतितीर्थावलोकी तीर्थयात्रावान् बहुलवृषमतिः अत्यंतधर्मबुद्धिश्चस्यात् तथा पापग्रहयुक्तेसतिपापी मिथ्याकोशांतकृत् वृथासंचितद्रव्यनाशकृत्स्यात् अस्माद्योगान्नियतंफलंज्ञेयं प्रसिद्धधर्मेनिरतोऽष्टमेभवश्चापेतुशास्त्रेविहगः स्वधर्मा मृगे विरज्येतसुधर्मतोनाकुंभेतुपापादिभवोहिधर्मः ॥१ ॥ मीनेबलिष्ठेशुभभावजातोतडागवापीभवधर्मनिष्ठः भाग्येशलग्नगेभूपकर्मकारीधनेधनं बंधुप्रियोभ्रातृभावेचतुर्थेपितृभाक्तिमान् ॥ २ ॥ कृतीतुपंचमेषष्ठेजातोविकलकारकः सप्तमेसुभगस्त्रीवान्खंडः पापाष्टमस्थिते स्वभेदातादेवभक्तोदशमेनृपकार्यकृत् लाभेदीर्घायुरखिलोव्ययेदेशांतरस्थितिः स्वस्वामिदृष्टयुक्तंचेत्स्वदेशफलदायकः मुनिभिरुक्तंहोरागमश्चबलवान्येषांतेश्रेष्ठमानवाः होरासारे भाग्येखलाः स्वगृहगाः शुभदृष्टियुतायदि सौभाग्यसौख्ययुक्तस्यजन्मविद्याच्चभूपतेः ॥ ३ ॥ क्रूरानीचारिभांशस्था भाग्येशेनचवीक्षिताः सर्वदाभाग्यहीनस्यजन्मविद्यान्नसंशयः ॥ ४ ॥ लग्नगेभांतरेराशौमहाभाग्योहिभाग्यतः एकेनमध्यभाग्यः स्यादभावेहीन भाग्यवान् ॥ ५ ॥ गर्गजातके हंतिपुण्यंच भाग्यंच कर्म-

पुण्यगतोनृणां तुंगेस्वर्क्षेसहस्रांशुः पुष्कलं धर्ममादिशेत् ॥ ६ ॥ भाग्येभाग्यं भवेद्धन्यः
पितृपक्षपरायणः धर्मेपूर्णोनिशानाथः क्षीणः सर्वविनाशकृत् ॥ ७ ॥ कुजेरक्तपदानं-
दीभवेत्पशुपतिव्रती भाग्यहीनश्चसततंनरः पुण्यगृहंगते ॥८॥ मंदभाग्योबुधेपापेशुभेसा-
म्येतुधार्मिकः महाभाग्यशुभेजीवेतथाशुक्रेबलीयसी ॥ ९॥ दंडप्रदोवक्रगते नवमस्थेश-
नैश्चरेस्वर्क्षोच्चगेशनौभाग्येराजाभवतिधार्मिकः ॥ १० ॥ राहौधर्मगतेजातः सत्यशौच-
विवर्जितः अन्यत्र भाग्याधिपश्चेद्यदिकेंद्रवर्तीआदौवयस्येवसुखी मनुष्यः त्रिकोणगः
स्वोच्चगतोऽथवास्यान्मध्येवयस्यल्पफलप्रदःस्यात् ॥ १ ॥ भाग्यस्यनाथेस्वगृहेथमित्रगृ-
हेथवास्यात्स्वनवत्रिभागे भाग्योदयंतस्यवदंतितज्ज्ञाः शुभग्रहैर्द्वैश्वयुतेक्षितेच ॥ २॥ नी-
चस्थोवाशत्रुगेहस्थितोवा भाग्यस्वामी रिःफ रंध्रारिगोवा पापैः खेटैः संयुतोवाथदृ-
ष्टोभाग्यैर्हीनः स्याद्दरिद्रः सदैव ॥३॥ नवमभावपतीरिपुरंध्रगोनवमभेरिपुदृष्टयुतंतथा
यदितदानच धर्मरतोनरः शुभखगैरथधर्मयुतोनरः ॥ ४ ॥ अबलेऽपि शुभेखेटभाग्य-
स्थोधार्मिकोनरः शुभवर्गयुतेभाग्येशुभकर्मयथान्यथा ॥ ५ ॥ इत्यादिचिंताविधेया
तत्राहजातकसारावलीकारः होरेंद्वोर्बलयोगाद्योदशमस्तत्स्वभावाजंकर्म तस्याधिपतेश्च-
तथावृद्धिर्ज्ञेया तथाहानिः दशमेनक्षत्रपतिर्लग्नात्पुरुषस्ययस्यसंभवति सवारंभेभवति-
हिविनिर्दिशेत्तस्य जातस्य जातकसारे खस्थेखगेखलयुतेखलजेनवांशेस्वोच्चर्क्षगेस्वभ-
वनेसुखवृत्तयः स्युः नीचारिभावगृहगेऽल्पसुखाल्पपुण्योदासोपचारभृतकानुचराश्च-
दासीः धर्मभावेशुभक्षेत्रेशुभदृष्टेसुकर्मकृत् पापेक्षितेपापकर्मास्वामिदृष्टेतुमध्यमाः वैद्याः
पुरोहिताः शास्त्रस्मृतिज्ञावंचकानराः जायंतेकर्मगैः पापैः सौम्यग्रहनिरीक्षितैः वराहः
अर्थाप्तिः पितृपत्निशत्रुमित्रभ्रातृस्त्रीभृतकजनादिवाकराद्यैः होरेंद्वोर्दशमपतेर्विकल्पनी-
याभेंद्वर्कास्पदपतिगांशनाथवृत्या ॥ १ ॥ अर्कांशेतृणकणकर्णभेषजाद्यैश्चंद्रांशेकृषिज-
लजांगनाश्रयैश्च धात्वग्निप्रहरणसाहसैः कुजांशेसौम्यांशेलिपिगणितादिकाव्यशीलैः
जीवांशेद्विजविबुधदिवाकरादिधर्मैः काव्यांशेमणिरजतादिगोमहिष्यैः सौरांशेश्रमवध-
भारनीचशिल्पैः कर्मेशाध्युषितनवांशकर्मसिद्धिः मित्रारिस्वगृहगतैस्ततस्ततोर्थात्तुंग-
स्थेबलिनिचभास्करेस्ववीर्यात् राज्याधीशेकेंद्रगेसौम्यदृष्टेपापेकेंद्रस्थात्सुप्रतापाभिधानः
जातोनित्यंभूमिपैः सेवनीयोभाग्यैर्युक्तःसुप्रतापप्रसिद्धइति अथलाभस्थानेअखिला-
नांवस्तूनांप्राप्तिचिंताविधेयातत्रहोराप्रदीपेस्वस्वामिग्रहयुतेक्षित आयुर्वर्गेसद्ध्येकभव-
तिवस्तुविशेषलाभः क्रूरेचदृष्टिसहितेनचतत्रलाभस्तद्वर्गकेप्यथचमिश्रफलंविधत्ते लाभे-
रवीक्षितयुतेरविवर्गयुक्तेचोराच्चतुष्पदयुताच्चभवेत्प्रतापः तद्वृद्धिर्यौयुवतितोयजनाद्दिजा-
तोवित्तंसुवर्णमणियावकशास्त्रजातः ज्ञायंक्षितिज्ञागणआयेग्रहं धनंस्यात् शिल्पादिका-
लेखनैस्तुंगैसकांस्यैःजीवेक्षितायगुरुवर्गयुतायगेहेयज्ञादि हेमहयनागरथादिमुख्यैः शुक्रे-
क्षितायशनि शनिवर्गयुते महिष्यलोहादिकृष्यवनकार्यभावाविद्याद्धिः नीचारिभार्कग-
खगोक्तफलंनदद्याद्वीतिग्रहोद्भवबलेबलिनस्तुवाच्यमिति व्ययग्रहान्निधनग्रहाच्चमालि-
नकर्मणांचिंताविधेया गर्गजातके क्षीणेऽब्जेयारवौ रिःफे धनंपुंसामथो हरेत् बहुधार्थक्ष-
योभौमेज्ञदृष्टेन्येषुसिद्धयः नृपीडानचसंतप्तंपरिवादेनपीडितः नृशंसंपुरुषंचाद्रिः कुरुते
व्ययराशिगः उच्छ्रितव्ययकारीचव्ययगेदेवतागुरौ श्रद्धाहीनोघृणाहीनोव्ययगेभार्ग-

वेनरः व्ययस्थानगतेमंदेक्रूरेषुकुरुतेरुचिं व्ययेराहौनीचकर्माकपटीकुलदूषकः व्ययेभावे स्वामियुक्तेशुभदृष्टे च सत्यापि कीर्तिमान् जायतेमर्त्योविपरीते विपर्ययः ॥ ३७ ॥

अर्थ.–द्वादशाधिपति लग्नीं असेल तर तो मनुष्य मधुरभाषण करणारा व सुंदर होतो. तो द्वादशाधिपति स्वराशीस असेल तर कृपण, अनेक पशुयुक्तग्रामाचा अध्यक्ष होतो. द्वादशाधिपति नवमस्थानीं असेल तर तीर्थयात्रा करणारा व अतिधर्मबुद्धि होतो. द्वादशाधिपति पापग्रहांनीं युक्त असेल तर पापाचरण करणारा उधळपट्या होतो. हीं सर्व फळें सदासर्वकाळ होतात. ग्रह, दशा, काल नको. द्वादशभाव कोष्टक पुढें आहे.

अध्यायाचा उपसंहार.

हृद्यैःपद्यैर्गुंफितेसूरितोषेऽलंकाराख्येजातकेमंजुलेऽस्मिन् ॥
भावाध्यायःश्रीगणेशेनवर्यैर्वृत्तैर्युक्तःशैलरामैःप्रणीतः॥ ३८॥

इतिश्रीजातकालंकारेभावफलाध्यायोद्वितीयःसमाप्तः॥ २ ॥

टीका.—सुधीभिरिदंनियतं नियमेन ज्ञेयम् अध्यायं समापयति शालिनीवृत्तेन श्रीगणेशेन भावाध्यायः शैलरामैर्वृत्तैः सप्तत्रिंशद्भिः श्लोकैरुक्तः ॥ ३८ ॥

॥ इति श्रीजातकालंकारटीकायांभावफलाध्यायो द्वितीयः ॥ २ ॥

अर्थ—मनोहर पद्यांनीं रचिलेला विद्वान् लोकांस संतोषकारक जातकशास्त्राला अलंकाररूप मंजुळ असा भावाध्याय श्रीगणेशकवीनीं सद्तीस श्लोकेंकरून परिपूर्ण केला. इतिश्री जातकालंकार सार्थ भावफले द्वितीयोध्यायः २

अध्याय ३ रा.

विषय प्रतिज्ञा (शिखरिणी वृत्त.)

ग्रहाधीनायोगाःसदसदभिधानाजनिवतां ॥
ततोयोगाधीनंफलमितिपुराणैःसुमुदितं ॥
अतोवक्ष्येयोगान्सकलगणकानंदजनकान् ॥
शुकास्याद्दुद्भूतंमतमिहविलोक्येहरुचिरम् ॥ १ ॥

टीका.–अथयोगाध्यायः तत्रतावत् शुभाशुभयोगान् व्यवस्ययोगांतरंवक्तुं प्रति-

जानीते शिखरिणीवृत्तेन पुराणैर्वसिष्ठशुकपराशरप्रभृतिभिः प्रोक्तंफलंयोगाधीनं अतः सकलगणकानंदजनकान् अशेषज्योतिर्विदांप्रीत्युत्पादकान् योगान्वक्ष्ये किंकृत्वाशुकास्यात् शुकमुनिमुखादुद्भूतंरुचिरंशोभनमतंविलोक्य आलोच्य ॥ १ ॥

अर्थ—सदसद्योग ग्रहाधीन आहेत. ह्मणून मनुष्यांचे किंवा प्रत्येक प्राणिमात्राचे जन्मलग्नीं योगानुसंधानानें फलें सांगावीं असें पूर्वीचे आचार्यांचें मत आहे ह्मणून सकलज्योतिषी लोकांस आनंददायक असे योग शुकप्रणीत एकत्र करून ग्रहांचीं केवळ योगजन्यफलें वर्णन करतों.

दुष्ट योग (स्रग्धरा वृत्त.)

ऋक्षेशःक्षीणवीर्यःसुतनवमगतोमानवोमन्युमान्वै ॥
राशीशेसांगनाथेरिपुनिधनगृहप्रांत्यगेदुर्बलःस्यात् ॥
धर्मद्वेष्याष्टनाथाःखलखचरयुताःस्थानकेक्वापिसंस्था ॥
स्तैर्दृष्टाःस्यात्तदानींपरपुरुषरतासुंदरीतस्यपुंसः ॥ २ ॥

टीका—अथातःस्रग्धरावृत्तम् अथानिष्टयोगानाह ऋक्षेशः जन्मराशिनाथः क्षीणबलःसन् त्रिकोणगतश्चेन्मानवोजातः मन्युमान् क्रोधीस्यात् जन्मराशीशेसांगनाथे तनुपतिसहितेत्रिकस्थेदुर्बलःस्यात् यस्यनवमषष्ठाष्टमेशाः क्रूरग्रहदृष्टियुक्ताःयत्रकुत्रापि स्थिताः यदितदानीं तस्यभार्याजारगामिनीस्यात् ॥ २ ॥

अर्थ—जन्मकालीन चंद्र राशिस्वामी त्रिकोणांत असेल तर तो मनुष्य क्रोधी होतो. जन्मराशीस्वामी तनुपतीशींयुक्त असून त्रिकस्थानीं (षष्ठ, अष्टम, द्वादश या स्थानीं) असेल तर तो मनुष्य दुर्बल (अशक्त) होतो. नवम, षष्ठ, अष्टम या स्थानांचेस्वामी पापग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असतील तर त्या पुरुषाची बायको परपुरुष रत होते.

जार जनन.

मातृस्थानेस्थितौचेत्कुजविधुसहितौषष्ठरंध्राधिनाथौ ॥
स्यातांयस्यप्रसूतौभवतिखलुनरस्त्वन्यजातस्तदानीं ॥
क्वापिस्थानेस्थितौस्तःकलुषखगयुतोभाग्यरंध्राधिनाथौ ॥
चेदेवंराहुणावातदनुचशिखिनासंयुतावन्यजातः ॥ ३ ॥

टीका.—यस्यजन्मनि षष्ठाष्टमभवननाथौ कुजविधुयुतौचतुर्थस्थौस्यातां तदानीं सनरः अन्यजातः जारजातः तथानवमषष्ठाधिनाथौ यत्रकुत्रापिस्थितौ क्रूरग्रहयुतौ अथवा केवलेन राहुणाशिखिनावायुतौस्यातां तदान्यजातः कलुषखगयुता वित्यने-

नराहुः केतुरपिसर्वक्रूरयोगेविवक्षितः अग्रिमश्लोकेमंदादीनांपार्थक्येन योगापदेशात् कलुषखगयुता वित्यनेनैवसिद्धे राहु केतु ग्रहणं छंदोनुरोधात् ॥ ३ ॥

अर्थ—षष्ठ, अष्टम स्थानाचे स्वामी मंगळ चंद्रानेंयुक्त असून चतुर्थस्थानीं असतील तर तो मनुष्य जारजात सांगावा. नवम व षष्ठाधिपति पापग्रहानीं युक्त किंवा राहु केतूनें युक्त असतील तर तो मनुष्य जार जात सांगावा.

जाराची जाति.

युक्तौमंदेनशूद्रादथभवतिविदावैश्यतोभास्करेण ॥
क्षत्राज्जातःसितेनत्रिदशपगुरुणाभूमिदेवात्प्रसूतः ॥
दैत्येशेज्यौसपापौमदनरिपुधनस्थानगौचेत्परस्त्री ॥
गामीव्योमारिपौस्तोगगनभवनगौतात्पितान्यारतःस्यात्॥४

टीका.—भाग्यषष्ठाधिनाथौमंदेनयुक्तौशूद्राज्जातः उत्पन्नोभवति अथबुधयुक्तौवैश्याज्जातः भास्करेणयुतौचेत्क्षात्रियाज्जातः गुरुशुक्राभ्यांब्राह्मणाज्जातः बुधगुरुशुक्राणांकलुषखगयुतत्वेक्रूरैर्दृष्टत्वेतद्योगेननीचत्वेनास्तंगतत्वेक्रूरवर्गस्थत्वेन वा सुधीभिर्बोध्यं अथ शुक्रबृहस्पतीसक्रूरौ सप्तमषष्ठधनस्थानगतौचेत्तदापरस्त्रीगामीस्यात् दशमषष्ठाधिपौ दशमस्थौ तदातत्पिताजातस्यपिताअन्यारतःस्यात् परस्त्रीगामीस्यात् ४

अर्थ—ते नवम षष्ठाधिपति शनीनें युक्त असेल तर शूद्रापासून झाला. बुधानें युक्त असेल तर वैश्यापासून झाला. सूर्यानें युक्त असेल तर क्षत्रियापासून, अति निर्बल गुरु शुक्रानें युक्त असून इतर पापग्रहांची दृष्टि किंवा योग असेल तर ब्राह्मणापासून उत्पत्ति सांगावी. शुक्र व बृहस्पति पापग्रहांनीं युक्त असून सप्तम, षष्ठ, व द्वितीय या स्थानीं असतील तर परस्त्रीगामी तो पुरुष होईल. दशमाधिपति व षष्ठाधिपति हे दोघे दशमांत असतील तर त्याचा बाप परस्त्रीरत सांगावा.

अनिष्ट योग.

मूर्तीशःपापयुक्तोधनसदनगतश्चेत्तदासज्जनस्त्री ॥
संयुक्तस्तत्पितास्यात्खलविहगयुताःकामशत्रुस्वनाथाः ॥
कोशस्थास्तद्वदेवंफलमितिविविधंभ्रातृपत्न्योश्चपित्रोः॥
स्थानेशाःक्वापिभावेतनुपतिसहिताश्चेत्पुमानन्यजातः ॥५॥

टीका.—क्रूरयुक्तोलग्नेशः द्वितीयस्थश्चेत्तत्पितासज्जनस्त्री संयुक्तः साधुजनस्त्रीगामीस्यात् सप्तम षष्ठ द्वितीयभावेशाः क्रूरयुताः द्वितीयस्थश्चेत्तद्वदेवंफलंविविधमिति

एवंप्रकारः विविधफलमितिज्ञेयं सज्जनस्त्रियामासक्तिर्दुराचारत्वं अभक्ष्यभक्षकत्व-मित्यादिज्ञेयमितिभावः तृतीयसप्तमचतुर्थदशमेशास्तनुपतिसहितायत्रकुत्रापि स्थिता-श्चेज्जातः पुमान् जारजातः ॥ ५ ॥

अर्थ—लग्नाधिपति पापग्रहांनीं युक्त असून द्वितीयस्थानीं असेल तर त्याचा पिता स-ज्जनस्त्रीशीं रत राहील. सप्तम, षष्ठ आणि द्वितीय या स्थानांचेस्वामी द्वितीयस्थानांत पापग्रहांनीं युक्त असतील तरीही त्याचा पिता सज्जनस्त्रीशीं रत राहील व दुराचारी वगैरे ग्रहांचे मानानें सांगावें. तृतीय, सप्तम, चतुर्थ व दशम या स्थानाचे अधिपति लग्नेशानें युक्त असून कोठेंही (कोणतेही स्थानीं) असतील तर तो मनुष्य अन्य जात सांगावा. याप्रमाणें द्वादश भावावरून सांगावें,

कुष्ठ रोगाचे योग.

लग्नाधीशेंदुपुत्रौक्षितितनयनिशानायकौक्कापिसंस्थौ ॥
युक्तौस्वर्भानुनावाभवतिहिमनुजःकेतुनाश्वेतकुष्ठी ॥
आदित्योभौमयुक्तस्तदनुशनियुतोरक्तकृष्णाख्यकुष्ठी ॥
सार्कोलग्नाधिनाथोव्ययरिपुनिधनस्थानगस्तापगंडः ॥६

टीका.—लग्नेशबुधौकुजचंद्रौवाराहुकेत्वन्यतरयुतौ तदाजातः श्वेतवर्णोपलक्षित कुष्ठरोगीभवति तदनुभौमशनियुतः आदित्यश्चेद्रक्तवर्णनामककुष्ठवान्स्यात् सूर्ययुतो लग्नेशः त्रिकभवनस्थस्तदाजातस्य तापगंडस्तापगंडान्वितोगंडोरोग विशेषःस्यात् ६

अर्थः—लग्नाधिपति, बुध, मंगळ व चंद्र हे कोणतेही स्थानीं असतील व राहु आणि केतु यांनीं युक्त असतील तर तो मनुष्य श्वेत कुष्ठी होतो. रवि, शनि व मंगळ यांनीं युक्त असून कोठेंही (कोणतेही स्थानीं) असले तरी तो मनुष्य रक्त (-तांबडें) व काळे कुष्ठानें युक्त होतो. लग्नाधिपति व रवि षष्ठ, अष्टम, द्वादश या स्थानांत असतील तर त्या मनुष्यास तापगंड होतो.

नाना रोगांचे योग.

ज्ञेयश्चंद्रेणगंडोजलजइहयुतोग्रंथिशस्त्रव्रणःस्यात् ॥
भूमीपुत्रेणपित्तंहिमकरतनयेनाथजीवेनरोगः ॥
आमोद्भूतस्ततश्चेद्भृगुतनययुतोनुःक्षयाख्योगदःस्यात् ॥
चोरोद्भूतोऽत्यजाद्वायमशिखितमसामेकयुक्तन्वधीशः ॥७॥

टीका.—चंद्रेणयुतोलग्नेशः त्रिकस्थश्चेज्जलजोगंडःस्यात् भौमयुतोलग्नेशस्त्रिक-

स्थश्चेत्तदाग्रंथिशस्त्रव्रणःस्यात् ग्रंथ्युपलक्षितः शस्त्रजोव्रणः स्यादित्यर्थः बुधयुतोलग्नेशः त्रिकस्थः पित्तरोगःस्यात् जीवेनयुतोलग्नेशः त्रिकस्थश्चेत्तदाआमोद्भूतः आमकोपजोरोगःस्यात् शुक्रेणयुतस्तत्रस्थितोलग्नेशस्तदानुर्मनुष्यस्यक्षयाख्योरोगः यमाशिखि तमसामेकयुक् शनिराहुकेतूनांमध्ये एकेनयुक्तो लग्नेशः त्रिकस्थश्चेत्तदा चोरजः अंत्यजादुत्पन्नोवारोगःस्यात् रजकचर्मकारादयोंत्यजाः ॥ ७ ॥

अर्थः—तोच लग्नाधिपति चंद्रानें युक्त असून षष्ठ, अष्टम, द्वादश या स्थानीं असेल तर जलजगंड (पाण्याचा गंडरोग) होतो. मंगळानें युक्त असून त्या स्थानांत असेल तर गांठीसारखा शस्त्रापासून व्रण (घावछिद्र) होतो. बुधानें युक्त असून तसा पडेल तर पित्तरोगानें व्याप्त होतो. गुरूनें युक्त असेल तर आंवेपासून रोग होईल. शुक्रानें युक्त असेल तर त्या-पुरुषाला क्षयरोग होतो. शनि, केतु किंवा राहु यांतून कोणतेही एकाग्रहानें युक्त असला तर चोरापासून व अंत्यजापासून रोग होईल.

विविध पिडा.

चंद्रोमेषेवृषेवाकुजशनिसहितःश्वेतकुष्ठीसरोगो ॥
दैत्येज्यारेंदुमंदास्तिमिभवनगताःकर्कटालिस्थितावा ॥
अंगेसौख्येनहीनःपरमकलुषकृद्रक्तकुष्ठीनरःस्यात् ॥
वागीशोभार्गवोवायदिरिपुगृहपोमूर्तिगःक्रूरखेटैः ॥ ८ ॥

टीका.—कुजशनियुतश्चंद्रोमेषेवृषे वा यदितदानरः श्वेतकुष्ठीस्यात् शुक्रभौमेंदुशनयः मीनराशिस्थायद्वाकर्कटवृश्चिकस्थाः तदानरः शरीरसौख्यरहितः महापातकी रक्तकुष्ठीस्यात् गुरुः शुक्रो वा षष्ठभावाधिपक्रूरैर्दृष्टोलग्नस्थश्चेत्तदावक्ष्यमाणोफी मुष्काधिकरणकश्वयथुरोगयुतः स्यादित्यग्रिमश्लोकेनसंबंधः ॥ ८ ॥

अर्थः—चंद्र, मेष किंवा वृषभ राशीस असून मंगळ शनीनें युक्त असेल तर श्वेतकुष्ठी होतो. शुक्र, मंगळ, चंद्र व शनि हे मीन, कर्क किंवा वृश्चिक राशीला असतील तर तो मनुष्य शरीरसौख्यानें कमी होईल. व पापाचरण करणारा रक्तकुष्ठी होईल.

तात्पर्य.

शुक्र, मंगळ, चंद्र व शनि हे मीनराशीस असतील तर शरीरसौख्य होणार नाहीं. तेच ग्रह कर्कराशीला असतील तर पुष्कळ पाप करणारा होईल. तेच ग्रह वृश्चिकराशीस असतील तर रक्तकुष्ठी होतो. गुरु, शुक्र किंवा षष्ठस्थानचास्वामी लग्नांत असेल तर व पापग्रहांची दृष्टि त्यांजवर असेल तर हे पूर्वोक्त योग सांगावे. ग्रहबलानें पूर्ण फल होतें.

विविधपीडा.

दृष्टश्चेद्वक्त्रशोफीत्वथखलसहितामीनकर्कालिभावा ॥
लूताकारश्चिरंस्यात्परमगदकरःकुष्ठएवंनराणां ॥
रिःफस्थानस्थितश्चेद्विबुधपतिगुरुर्गुप्तरोगीनितांतं ॥
भूमीमार्तंडपुत्रौव्ययभवनगतौशत्रुगौवाव्रणीस्यात् ॥९॥

टीका.—अथ मीन कर्क वृश्चिकराश्युपलक्षिताभावाः क्रूरसहिताः यदितदानराणांएवं प्रकारेणचिरंकुष्ठंस्यात् तत्रप्रकारमाह यत्रलूताकारकः सविशेषः जंतुविशेषः उत्कृष्टगदविशेषकरः लुताकारकृत्कुष्ठः स्यादित्यर्थः गुरुर्व्ययस्थश्चेन्नरः गुह्यरोगीस्यात् यद्वावैद्याज्ञानरोगीस्यात् भौमशनीव्ययेषष्ठेवास्यातांतदाव्रणीव्रणयुतःस्यात् ॥ ९॥

अर्थ.—आणि त्याच्या तोंडाला सूज येईल. मीन, कर्क व वृश्चिक या राशीस पापग्रह असतील तर लूताकार (गलितकुष्ठ) होईल. द्वादशस्थानीं गुरु असेल तर गुप्त (वैद्यांस परीक्षा न होणारा) रोग होईल. मंगळ व शनि द्वादशस्थानांत किंवा षष्ठस्थानांत असतील तर व्रण रोगी होतो.

नानारोगांचे योग.

मेषेमीनेकुलीरेतदनुचमकरेवृश्चिकेमंदचंद्रौ ॥
स्यातांक्रूरान्वितौचेन्नवमभवनगौमानवःस्याच्चखंजः ॥
लग्नस्थंपश्यतींदुंदिनमणितनयंभूमिजौद्यूनदृष्टौ ॥
बुध्याहीनोनरःस्याद्दिनविधुविवरेभूमिजश्चेत्तथैव ॥१०॥

टीका.—क्रूरग्रहयुतौचंद्रशनी मेषमीनमकरवृश्चिकान्यतम राशिगतौ नवमभवनगौचेन्मानवो जातः खंजः खंजाख्य पादरोगीस्यात् भूमीपुत्रः सप्तमदृष्ट्यालग्नस्थं चंद्रंशनिंचपश्यतिचेत्तदानरः बुध्याहीनःस्यात् इनविधुविवरेरविचंद्रयोर्मध्येभौमश्चेत्तथैवबुद्धिहीनःस्यात् इनशब्दोलक्षणयादिनकरपरोज्ञेयः ॥ १० ॥

अर्थ.—मेष, मीन, कर्क, मकर, वृश्चिक या राशींस शनि व चंद्र असून पापग्रहांनीं युक्त असतां नवमस्थानीं असतील तर तो मनुष्य खुजा (ठेंगणा) होतो. लग्नीं चंद्र असून त्यास सप्तमदृष्टीनें शनि पहात असेल तर त्या मनुष्याची बुद्धि हीन होते. चंद्र व सूर्य यांचेमध्यें मंगळ असेल तरी ही तो पुरुष बुद्धीनें हीन होतो.

बुद्धियोग.

प्रालेयांशौतनुस्थेगगनसदनगेसाधिकारेऽर्कसूनौ ॥
दृष्टेऽस्मिन्कामदृष्ट्याहिमकिरणभुवाबुद्धियुङ्मानवःस्यात् ॥
पृथ्वीसूनुंमृगांकंतनुनिलयगतंपूर्णदृष्ट्येंदुसूनुः ॥
पश्येच्चेद्बुद्धिहीनस्त्वथशशितनुपोभूभुवापीडितौवा ॥ ११॥

टीका.—चंद्रेलग्नेसाधिकारे ग्रहहोराद्रेष्काणादि वर्गाधि पत्यसहिते शनौदशम-स्थेबुधेनपूर्णेदृष्टेऽस्मिन्मानवोजातः बुद्धिमान्स्यात् लग्नस्थंभौमं चंद्रंचपूर्णदृष्ट्याबुधः पश्यतिचेद्बुद्धिहीनःस्यात् यद्वाचंद्र लग्नेशौभौमेनपूर्णदृष्ट्यापीडितौबुद्धिहीनःस्यात् ११

अर्थ.—लग्नीं चंद्र असून ज्याला सर्व अधिकार (षड्वर्गबलें) आहेत असा शनि दशमस्थानीं असतां बुध चतुर्थस्थानांत असेल तर तो मनुष्य बुद्धिमान् होतो. मंगळ व चं लग्नीं असतील व त्यांच्यावर बुधाची दृष्टि पूर्ण असेल तर बुद्धीने हीन होतो. लग्नस्वामी चंद्र हे मंगळाचे दृष्टीनें पीडित असतील तरी ही बुद्धिहीन (स्मृतिहीन) होतो.

अशुभ योग.

लग्नस्थेरौहिणेयेतदनुरविशनीक्रूरदृष्टौरिपुस्था ॥
वेकर्क्षेचैकभागेभवतिगतमतिर्दृष्टिहीनौशुभानां ॥
तिग्मांशौवैरिनाथेखलविहगयुतेतुर्यगेसूर्यसूनौ ॥
हृद्रोगीवाक्पतौवाभवतिहृदिनरःकृष्णपित्तांसकंपः॥१२

टीका.—लग्नस्थेबुधेतदनुक्रूरग्रहदृष्टौ पापग्रहदृष्टौशुभग्रहदृष्टिरहितौ रविशनी एकराशौ अथवा एकभागेचक्रस्यपूर्वार्धेवाएकत्र गौषष्ठस्थौचेत्तदागतमतिर्नष्टमतिः स्यात् षष्ठभवननाथेसूर्येक्रूरग्रहयुते तुर्यगेसतिहृद्रोगीस्यात् शनौगुरौवाषष्ठेशेक्रूरसहितेचतुर्थस्थे हृदिकृष्णपित्तरोगीस्यात् अथवादुष्टैःपीडितोहृदिसकंपःस्यात्॥ १२ ॥

अर्थ.—लग्नांत बुध असतां रवि व शनि क्रुर ग्रहांनीं दृष्ट किंवा युक्त असे षष्ठ स्थानांत किंवा एक अर्ध भागांत (लग्नापासून सप्तम स्थानापर्यंत) एका राशीस असतील व शुभग्रहानें दृष्ट किंवा युक्त नसतील तर नष्टबुद्धि होतो. षष्ठाधिपति रवि पापग्रहांनीं युक्त असून चतुर्थ स्थानांत असेल अथवा शनि षष्ठाधिपति होऊन चतुर्थ स्थानांत पापग्रहांनीं युक्त असेल तर तो मनुष्य हृद्रोगी होतो. गुरु षष्ठाधिपति होऊन चतुर्थस्थानांत पापग्रहांनीं युक्त असेल तर हृदयांत कृष्णपित्तरोगी किंवा भित्रा होतो. हे योग अशुभ आहेत.

दुःख योग.

दुष्टैर्वापीडितःसन्नथकुजरविजौवाक्पतिर्बंधुसंस्था ॥
हृद्रोगःस्यान्नराणांव्रणइहनियतंक्लेशकारीशरीरे ॥
पातालस्थोमहीजस्तनयनिलयगाःसूर्यवित्सैंहिकेयाः ॥
रंध्रस्थोभानुपुत्रोयदिजनुषितदास्यान्नरोदुःखभागी ॥ १३

टीका.—अथकुजः सूर्यजोगुरुश्चचतुर्थस्थायदितदाइह योगेहृद्रोगाद्धेतोर्नराणांशरीरे क्लेशकारीव्रणः नियमेनस्यात् यदाजन्मसमयेभौमः चतुर्थस्थः सूर्यबुधराहवःपंचमस्थाः शनिःअष्टमस्थः तदाजातो नरः दुःखभागी भवति. १३

अर्थ.—मंगळ, शनि व गुरु हे चतुर्थस्थानीं असतील तर हृद्रोग (निरंतर शरीरास त्रास देणारा व्रण) होतो. चतुर्थस्थानीं मंगळ, पंचमस्थानीं रवि, बुध व राहु आणि अष्टम स्थानांत शनि असेल तर तो मनुष्य दुःख भोगणारा होतो.

अशुभ योग.

लग्नंपश्येन्निजर्क्षेयदिधरणिसुतःसंस्थितःकातरःस्यात् ॥
च्छायासूनुर्नभस्थोयदिनिशिजननंतद्वदत्रापिवाच्यं ॥
मूर्तौभूमीतनूजेस्वजनकलहकृद्यूनगेस्वाधिकारात् ॥
हीनेभौमेवपुष्मान्परमयुधिरतस्तीक्ष्णभावश्चनूनं ॥ १४ ॥

टीका.—स्वक्षेत्रस्थितोभौमोयदिलग्नंपश्येत्तदाजातः कातरः भीरुःस्यात् यदि शनिर्दशमस्थोरात्रौजन्मचेदत्रापि तद्वाच्यं कातरः स्यादित्यर्थः लग्नगेभौमेस्वजनकलहकरःस्यात् स्वाधिकाराद्धीनेस्वग्रह होराद्रेष्काणादिरहिते सप्तमेभौमेवपुष्मान् दृढशरीरः अत्यंतयुद्धप्रीतिमान् तीक्ष्णस्वभावश्चस्यात् नूनंनिश्चयेन ॥ १४ ॥

अर्थ.—स्वगृहींचा मंगळ लग्नाला पहात असेल तर अथवा शनि दशमस्थानांत असून रात्रीचा जन्म असेल तर तो मनुष्य भित्रा होतो. लग्नीं मंगळ असेल तर स्वजनांत कलह लावणारा होईल. निर्बल मंगळ (स्वगृह वगैरे षड्वर्गांनीं हीन) सप्तमस्थानांत असेल तर शरीरानें दृढ होतो. व त्यास युद्धाची प्रीति असते व तो कठोर स्वभावाचा निश्चयें करून होतो.

नानाप्रकारचे योग.

पश्येताकामदृष्ट्याधरणिविधुसुतौचेन्मिथःस्यात्तदानीं ॥
उच्चाकारोऽथचंद्रंशनिरविमहिजाश्चेत्प्रपश्यंतिशीतः ॥

क्षीणेप्रालेयभानौधरणिजसहितेपापभूमिःखरःस्यात् ॥
मूर्तिस्थोद्यूनदृष्ट्याहिमकरतनयोवासवेज्यंप्रपश्येत् ॥१५॥
हास्यासक्तःसभौमेहिमकरतनयेस्याच्छुभर्क्षेकुजज्ञौ ॥
मंदर्क्षेवार्कदृष्टौनरपतिविदुषांरंजनेकोविदःस्यात् ॥
पश्येत्काव्यंसितांशुर्व्ययविलयरिपुस्थानगोविस्मयालुः॥
क्षिप्रंवाक्स्फुर्तिमान्स्यात्कुजबुधशशिनोवीर्यवत्खेटदृष्टाः१६

टीका.—धरणिविधुसुतौभौमबुधौमिथः अन्योऽन्यं सप्तमदृष्ट्यापश्येतां तदानीं जातः उच्चशरीरःस्यात् अथशनिरविभौमाश्चंद्रंपश्यंति पूर्णपश्यंतितदाजातः शीतः शीतलस्वभावःस्यात् शीतलत्वं जडत्वं मूर्खत्वमित्यर्थः क्षीणेचंद्रेभौमसहितेपापभूमीः पापकृत् खरस्तीक्ष्णभावःस्यात् मूर्तिस्थोबुधः सप्तमस्थंगुरुं पश्येत्तदाजातोहास्यासक्त इत्यग्रिमश्लोकेनसंबंधः ॥ १५ ॥ अथभौमसहितेबुधेशुभर्क्षेशुभग्रहराशौयद्वाकुजज्ञौ- सूर्यदृष्टौमंदराशिस्थाः तदाराज्ञांविदुषांच रंजनेहर्षोन्मुखीकरणेप्रवीणःस्यात् त्रिक- स्थः चंद्रःशुक्रंपश्येत्तदाविस्मयालुः विस्मययुक्तःस्यात् कुजबुधेंदवः बलिष्ठग्रहदृष्टाश्चे- च्छीघ्रं यथास्यात्तथावचनस्फूर्तियुक्तःस्यात् ॥ १६ ॥

अर्थ.—मंगळ व बुध परस्पर सप्तमस्थानांत असले तर शरीरानें उंच होतो. शनि,रवि, मंगळ हे जर चंद्राला पहात असतील तर थंड स्वभावाचा मूर्ख होतो. क्षीण चंद्र मंगळानें- युक्त असेल तर पापकर्म करणारा व तीक्ष्ण स्वभावाचा होतो. लग्नीं बुध व सप्तमांत गुरु असेल तर सदा हांसत हांसत बोलणारा होतो. शुभग्रहाचे राशीस मंगळ आणि बुध एके- ठिकाणीं असतील तरी ही हास्यासक्त होतो. मंगळ व बुध हे शनीचे गृहीं असून सूर्या- ची दृष्टि त्यांजवर असेल तर राजे किंवा विद्वान् लोकांस हांसवून खुष करणारा होतो. चंद्र षष्ठ, अष्टम, द्वादश या स्थानांत पडून शुक्रास पहात असेल तर तो मनुष्य विस्मयी होतो. मंगळ, बुध व चंद्र यांस बलीग्रह पाहात असतील तर लवकर लवकर बोलणारा होतो.

तात्पर्य.

ग्रहांच्या दृष्टि न्यूनाधिक असतील तर योगफलामध्यें न्यूनाधिकता सांगावी. दैवज्ञानें हें सदा लक्षांत ठेविलेंच पाहिजे.

व्यभिचार योग.

शुक्रज्ञौद्यूनयातौगगनविलयगौमानवःपुंश्चलःस्यात् ॥
कामाज्ञामांदिरस्थौकविधरणिसुतौतद्वदाज्ञांबुयातौ ॥

काव्यारौतद्वदिंदोर्नभसिरविसुतादास्फुजिन्नीरयायी ॥
तद्वत्कामास्पदस्थाबुधसितशनयःस्वर्क्षगेभार्गवेहि १७

टीका—शुक्रबुधौसप्तमाष्टमदशमगतौ तदामानवः पुंश्चलः व्यभिचारीस्यात् शुक्रभौमौसप्तमदशमस्थौतद्वत् पुंश्चलःस्यात् शुक्रभौमौचतुर्थदशमगतौतद्वत् पुंश्चलःस्यात् चंद्राद्दशमेशुक्रे शनेश्चतुर्थे शुक्रः तदातद्वत् पुंश्चलः शुक्रेस्वराशिस्थे शुक्रबुधशनयः सप्तमदशमस्थाः, तदातद्वदित्यनुषंगः ॥ १७ ॥

अर्थ.—बुध व शुक्र सप्तम, अष्टम किंवा दशम या स्थानीं १ शुक्र व मंगळ सप्तम किंवा दशमस्थानीं २ चतुर्थ व दशम या स्थानांत मंगळ व शुक्र ३ चंद्रापासून दशमस्थानांत किंवा शनीपासून चतुर्थस्थानांत शुक्र ४ सप्तम व दशम या स्थानांत बुध, शुक्र, व शनि असून त्यांत शुक्र स्वगृहींचा ५ अशा या पांच योगांतून कोणताही योग असल्यास तो मनुष्य व्यभिचारी होतो. सदसद्ग्रहावरून सदसत्स्त्रीव्यभिचार सांगावा.

अपयशाचे योग.

प्रालेयांशोःसिताद्वादिनमणितनयस्तत्पुरोभागवर्ती ॥
मूर्तौचेच्चंद्रशुक्रौयदितरणिसुतंपश्यतश्चायशाःस्यात् ॥
शेफश्छेदोनराणामथतपनसुतेभूमिकेंद्रेऽर्कयुक्ते ॥
दृष्टेकाव्योडुपाभ्यांयदिदिवसपतिश्चोपरागोत्रतद्वत् १८

टीका.—चंद्रात् शुक्राद्वाशनिस्तत्पुरोभागवर्तीतदग्रिमभावेस्थितः चंद्रसूर्यौलग्नस्थौ शनिंपश्यतश्चेत्तदाजातः अयशाः अपकीर्तिःस्यात् अथसूर्ययुतेशनौभूमिजकेंद्रे लग्नस्थेशुक्रचंद्र दृष्टेसतिदिवसपतेः सूर्यस्योपरागः शेपश्छेदः लिंगच्छेदः मद्वदपकीर्तिः स्यात् ॥ १८ ॥

अर्थ.—चंद्रापासून किंवा शुक्रापासून द्वितीय स्थानांत शनि असेल तर अथवा लग्नीं चंद्र व शुक्र असून ते शनीला पहात असतील तर तो मनुष्य अपयशी होतो. शनि चतुर्थ स्थानीं रवीनें युक्त असेल तर व शुक्र, चंद्र यानीं दृष्ट असेल किंवा सूर्यग्रहणाचा जन्म दिवस असेल तर त्या मनुष्याचा शेफश्छेद (शिश्नच्छेद) होतो. व अपयशी होतो.

अनिष्ट योग.

यातेवक्रग्रहर्क्षंजनुषिभृगुसुतेमानवस्तोषदायी ॥
सीमंतिन्यारतेःस्यान्नखलुमदनगंभार्गवंलग्ननाथः ॥

पश्येत्स्वीयालयस्थोयदिरहसितदाकामिनीतोषदाता ॥
नस्यादेवंहिमांशुर्दिनकरसुतयुक्भौमतःखेसुखेवा ॥१९॥

टीका.—शुक्रेवक्रग्रहराशिगतेसतिमानवोजातः सीमंतिन्याः रतेःसंभोगाद्धेतोस्तोषदायी सुखदायीसुखदः नस्यात् स्वीयालयस्थोलग्ननाथः सप्तमगः भार्गवंयदिपश्येत्पूर्णदृष्ट्याइतिशेषः तदाजातःरहसिरतिस्थाने कामिनीतोषदातानस्यादेव ॥१९॥

अर्थ—जन्मकाळीं वक्री असणाऱ्या ग्रहाच्या राशीस शुक्र असेल तर अथवा सप्तमस्थानांत शुक्र व लग्नेश लग्नांत असेल तर किंवा चंद्र शनीनें युक्त असून भौमापासून दशमस्थानांत किंवा चतुर्थस्थानांत असेल तर या तिन्हीं योगांतून कोणताही योग असल्यास तो मनुष्य स्त्रीला संभोगानें संतुष्ट न करणारा व अल्प पुंध्वजोच्छ्रितीचा (लाहान लिंगाचा)होतो.

कामवासनेचे योग.

क्षोणीपुत्रेणयुक्तःप्रथमसुरगुरुर्लग्नतःषष्ठपोऽयं ॥
कामाधिक्यंनराणांजनयतिनियतंपापदृष्टोविशेषात् ॥
काव्येस्वीयालयस्थेतदनुमिथुनगेकामवान्मानवःस्यात् ॥
मूर्तौसप्ताश्वसूनौधनुषिचवृषभेचेत्पुमानल्पकामः ॥२०॥

टीका.—द्वौनञौप्रकृत्यर्थंद्रढयतइतिन्यायात् चंद्रः शनियुतः भौमाच्चतुर्थेदशमेवास्यात्तदाएवमुक्त प्रकारेण कामिनी तोषदातानस्यादेव प्रथमसुरगुरुः शुक्रः भौमयुक्तेज्यलग्नात्षष्ठपः षष्ठभावाधिपःतदाजातः नराणांकामाधिक्यं कामबलप्रचुरतां नियमेन जनयतिसशुक्रः पापदृष्टश्चेत् विशेषात् कामाधिक्यं जनयति तदनुशुक्रेस्वभवनस्थेमिथुनस्थे वा मानवः कामवान्स्यात् सप्ताश्वपुत्रः शनिः धनुषिवृषे वा लग्नेचेत्तदा मानवोऽल्प कामःस्यात् ॥ २० ॥

अर्थ.—शुक्र मंगळानें युक्त असेल व तो शुक्र जन्मलग्नापासून षष्ठस्थानचा अधिपति असेल तर तो पुरुष कामी होईल. असा योग असून शिवाय पापग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तर तो मनुष्य अतिकामी होईल. स्वगृहींचा किंवा मिथुनराशीचा शुक्र असेल तर तो मनुष्य कामी होतो. धन किंवा वृषभ या राशीस लग्नीं शनि असेल तर तो मनुष्य अल्पकामी होतो.

नेत्रपीडा योग.

मंदेनक्रेऽल्पभाषीत्वथरिपुगृहपेवासुधांशावदृश्ये ॥
चेदर्धेसंस्थितेऽर्कोभवतिजनिवतांनेत्रयोःक्रूरयुक्ते ॥

पश्येत्क्षीणंनचंद्रंयदिभृगुतनयःसूर्यजःपश्यतींदुं ॥
स्वर्क्षेचंदेनभस्थैर्यदिमदनगतैर्वीक्ष्यतेपापखेटैः ॥ २१ ॥
स्यान्नूनंचाल्पनेत्रस्तदनुतनुगतंभूमिजंवाक्षपेशं ॥
पश्येद्वाचस्पतिश्चेदसुरकुलगुरुःकाणदृङ्मानवःस्यात् ॥
विच्छायातिग्मभानोःक्षितिभुविचपुरोभागगेदृङ्नराणां॥
सौम्येचिन्हंदृशिस्यादथवपुषिलयेभार्गवेक्रूरदृष्टे ॥ २२ ॥
नेत्रेपीडाश्रुपातात्तदनुशशिकुजावेकभावेयदाक्ष्णोः ॥
चिन्हंकिंचित्तदानींग्रहबलवशतोदृश्यमेवंसुधीभिः ॥
मार्तंडेरिःफयातेतदनुनवमगेपुत्रगेवाखलाढ्ये ॥
दृष्टेवास्यान्मनस्वीसुविकलनयनःसूर्यजेव्याधियुक्तः २३

टीका—शनौमकरस्थेसति अल्पभाषी प्रयोजनबहुभाषीभवति तदनुषष्ठभवन नाथेचंद्रे वा क्रूरयुते अदृश्यार्धेसंस्थितेसतिजनिवतांनेत्रयोरंकः चिन्हविशेषोभवति सप्तमभावभोग्यांशानारभ्याष्टमादिक्रमेणलग्नभुक्तांशपर्यंतं दृश्यार्धंज्ञेयं यदिक्षीणंचंद्रंशुक्रोनपश्येत् शनिरिंदुंपश्यति कर्कस्थेचंद्रेदशमेसप्तमे वा स्थितैः क्रूरग्रहैर्दृष्टे तदानूनं निश्चयेनस्वल्पनेत्रः स्यादित्यग्रिमपद्येनान्वयः॥२१॥तदनुलग्नस्थं भौमंचंद्रं वा वाचस्पतिः शुक्रश्चपश्येत् चेत्मानवः काणनेत्रःस्यात् तिग्मभानोः सूर्यात्पुरोभागगे अग्रगामिनि अस्ताभिलाषि भौमेनराणांदृक् विछायाकांतिरहितास्यात् सूर्यात् बुधेपुरोभागगे दृशिचिन्हंस्यात् अथभार्गवेशुक्रेलग्नस्थेष्टमेवाक्रूरदृष्टेसतिअश्रुपाताद्धेतोर्नेत्रपीडास्यात् अग्रिमश्लोकस्थेनसंबंधः ॥ २२ ॥ तदनुचंद्रभौमौएकभागैक नवांशस्थौ तदानेत्रयोः किंचित् चिन्हंस्यात् सुधीभिर्योगकर्तृग्रहबलवशात् एवमुक्तप्रकारेणादेश्यंवक्तव्यं तदनुक्रूरग्रहदृष्टेयुतेवासूर्येव्ययगेनवमेपंचमेसतिजातः सुविकलननेत्रोऽप्रशस्तनयनःस्यात् सूर्यजेशनौक्रूरयुतेदृष्टेद्वादशगेनवमपंचमगेव्याधियुक्तोरोगीस्यात् ॥ २३ ॥

अर्थ.—मकरराशीस शनि असेल तर तो मनुष्य अल्पभाषण करणारा होतो. षष्ठ स्थानचा स्वामी अथवा चंद्र पापग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असून अदृश्य गोलांत ह्मणजे लग्नापासून सप्तमस्थानापर्यंत (लग्न, राशि, अंश, कला, विकला जेवढे असेल त्यांत ६ राशि मिळविल्यानें जो आंकडा सप्तम भावाचा होतो त्याचेपर्यंत.) असेल तर डोळ्यांस कांहीं चिन्ह होतें. क्षीणचंद्र कर्कराशीस असून त्यावर शुक्राची दृष्टि नसून व शनीची दृष्टि असून शिवाय दशम व सप्तमस्थानांत असलेल्या पापग्रहांची दृष्टि त्या चंद्रावर असेल तर अल्प (बारीक) डोळ्यांचा मनुष्य होतो. लग्नीं मंगळ किंवा चंद्र असून गुरु किंवा शुक्र त्यास पहात असेल तर तो मनुष्य काणा होतो. सूर्यापासून द्वितीय स्थानांत वक्रीं असून

अस्तंगत होणारा मंगळ असेल तर त्याचे डोळे निस्तेज होतात. तसाच वक्री असून अस्तंगत होणारा बुध असेल तर डोळ्यांस चिन्ह होतें. लग्नीं किंवा अष्टमस्थानीं शुक्र पापग्रहांनीं दृष्ट असेल तर अश्रुपातानें डोळ्यांस इजा होईल. चंद्र व मंगळ एके राशीस किंवा एकाच नवमांशांत असतील तर डोळ्यांवर खूण होते. द्वादश, नवम व पंचम या स्थानांत पापग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट रवि असेल तर तो मनुष्य मोकळ्या मनाचा व मोठाले डोळ्यांचा होतो. आणि शनि असेल तर रोगी होईल. २१।२२।२३ हीं फळें ग्रहांचें बलाबल पाहून सांगावीं.

पीडा योग.

चंद्रंपृष्ठोदयस्थंहिबुकगृहगतःसूर्यसूनुःप्रपश्ये ॥
दित्थंलग्नाधिनाथेक्रियभवनगतेमानवोवामनःस्यात् ॥
कोशेपीयूषभानुर्जलचरगृहगःसौरिणासंयुतोवा ॥
मार्तंडेभूमिकेंद्रेयदिभवतितदादद्रुमान्पूरुषःस्यात्॥२४॥

टीका.—पृष्ठोदयराशिगंचंद्रंचतुर्थभावस्थः शनिः प्रपश्येत् लग्नपेमेषराशिस्थिते जातोमानवः वामनः ऱ्हस्वकायः स्यात् जलचरराशिस्थः चंद्रःद्वितीये अथवाशनिनायुक्ते अथवासूर्येलग्नगेयदिभवतितदादद्रुमान् कुष्ठयुक्तः पुरुषःस्यात् ॥ २४ ॥

अर्थ.—चंद्र पृष्ठोदय राशीस असून चतुर्थस्थानांत असणारा शनि त्यास पहात असेल किंवा लग्नस्वामी मेषराशीस असेल तर तो मनुष्य ठेंगणा होतो. द्वितीयस्थानीं जलचर राशीस चंद्र असेल किंवा शनीनें युक्त असेल तर अथवा लग्नीं रवि असेल तर त्या मनुष्यास दद्रुरोग (दाद) होतो.

विविधपीडा योग.

दृष्टेक्रूरैर्नसौम्यैर्यदिरिपुगृहपेचोडुपेप्लीहवान्स्यात् ॥
एवंकामांगनाथेतदनुरविसुतस्तुर्यगोनष्टदृष्टिः ॥
प्लीहीस्याल्लग्ननाथेदिनकरतनयेक्रूरनिष्पीडितेचेत् ॥
सौख्यायुङ्मानवःस्यात्तदनुसदनगेप्लीहवान्हर्षहीनः२५

टीका.—षष्ठभावाधिपेचंद्रेसौम्यदृष्टिरहिते केवलंक्रूरैर्दृष्टेप्लीहपीडितःस्यात् एवंकामांगनाथेसप्तमनाथेलग्ननाथेवाचंद्रेकेवलंक्रूरदृष्टेप्लीहवान्स्यात् पापग्रहैर्दृष्टः शनिः चतुर्थश्चे न्नष्टदृष्टिः अंधःस्यात् क्रूरग्रहैः निष्पीडितेदृष्ट्यायोगेन वा विकलीकृते यद्वावर्जिते लग्नेशे शनौसौख्यायुक् सौख्यरहितःस्यात् लग्नगतेशनौप्लीहवान् आनंदरहितश्चस्यात् ॥२५

अर्थ.–षष्ठस्थानचा अधिपति चंद्र क्रूरग्रहांनीं दृष्ट असून व त्यास शुभग्रह कोणी पहात नसतील तर त्या मनुष्यास पानथरी होईल. त्याचप्रमाणें चंद्र सप्तमस्थानाचा अधिपति किंवा लग्नाधिपति होऊन पापग्रहांनीं दृष्ट व शुभग्रहांनीं अदृष्ट असेल तरी ही पानथरी रोग होतो. हे योग कर्क, मकर व कुंभ ह्या लग्नांवर पहावे. शनि चतुर्थस्थानीं असेल तर दृष्टीनें नष्ट (अंधळा) होतो. शनि लग्नस्वामी होऊन पापग्रहांनीं युक्त अथवा दृष्ट किंवा पापकर्तरींत[1] असेल तर प्लीहा रोग होतो व दुःखी होतो. नुसता लग्नीं शनि निर्बल पापग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तर प्लीहा रोग होतो व हर्ष हीन ही होतो.

विविधपीडा योग.

क्रूराःकेंद्रालयस्थावपुषिचविकलःकेंद्रगौपुष्पवंतौ ॥
किंवालग्नेप्रपश्येत्कविमिनतनयःश्रोणिभागेऽगहीनः ॥
काव्यःपातालयायीसुरपतिगुरुणाक्वापियुक्तोऽर्कसूनुः ॥
भौमोवारौहिणेयोभवतिहिविकलःश्रोणिभागेभुजेंऽघ्रौ २६

टीका.—यदाक्रूराः केंद्रगास्तदाजातः वपुषिशरीरेविकलः विकलांगःस्यात् पुष्पवंतौसूर्यचंद्रौकेंद्रगौ वा तदाविकलांगः अत्रपुष्पवंतावित्युक्त्याचंद्रसूर्ययोरेकराशिस्थत्वंविवक्ष्यते चंद्रस्यक्षीणत्वाद्योगेऽस्यविकलइतिभावः लग्नस्थंशुक्रंशनिः पश्येत्तदाश्रोणिभागेकटितटेअंगहीनः शुक्रश्चतुर्थगः गुरुसहितः शनिर्भौमोबुधो वा यत्रकुत्रस्थितस्तदाकटितटेहस्तेचरणे वा विकलःस्यात् ॥ २६ ॥

अर्थ.–क्रूरग्रह केंद्रीं असतील तर शरीरानें विकल (परतंत्र) राहील. रवि व चंद्र हे केंद्रांत किंवा दोन्हीही लग्नांत असतील तर सर्व गोष्टींनें विकल होतो. लग्नीं शुक्र असून त्यांस शनि पहात असेल तर कटिस्थानीं पीडा होईल. चतुर्थस्थानचा शुक्र गुरूनें युक्त असेल तर कटिस्थानीं अथवा तोच शुक्र शनीनें युक्त असेल तर आंघ्रि (पाय) स्थानीं. तसाच मंगळानें किंवा बुधानें युक्त असेल तर बाहुस्थानीं विकल होतो. याप्रमाणें १२भावावर पहावें.

विविधपीडा योग.

आयुःपुण्याधिनाथौयदिखलखचरात्तुर्यगौपापयुक्तौ ॥
जंघावैकल्यवान्स्यात्कुजशनिसहितेसैंहिकेयेचसूर्ये ॥
द्वेष्यस्थेतद्वदेवंशनिरिपुगृहपौरिःफयातौखलैश्चेत् ॥
दृष्टौतद्वत्तदानींरविविधुरविजावैरिरंध्रालयस्थाः ॥ २७ ॥

---

१ टीप.—कर्तरी ह्मणजे कोणत्याही ग्रहाच्या द्वादशस्थानीं पापग्रह मार्गी व द्वितीयस्थानांत पापग्रह वक्री असेल तर तो ग्रह कर्तरींत आहे असें एक राशींत ही कर्तरींत ग्रह आहे असें समजावें.

स्यादार्तिःपंचशाखेतदनुदशमगेसूर्यसूनौसिताढ्ये ॥
क्लीबःस्यात्सूर्यसूनौव्ययरिपुगृहगेशुक्रतःक्लीबरूपः ॥
पश्येत्सूर्यालयस्थोमदनभवनगंभूमिसूनुंसुधांशुः ॥
चार्कःकाणश्चकर्केयदिशुभगृहपोमेषसिंहालिनक्रे ॥ २८॥

टीका.—निधननवमेशौक्रूराच्चतुर्थगौक्रूरयुतौजंघावैकल्यवान् पंगूरुःस्यात् रा-हौभौमशनियुतेषष्ठगेचकारात् भौमेशनियुतेसूर्येषष्ठगतेतद्वत्पंगुःस्यात् एवंशनिषष्ठभा-वेशौक्रूरदृष्टौव्ययस्थौतद्वत् पंगुःस्यात् सूर्यविधुशनयः षष्ठाष्टमभावस्थाः तदानींतस्य पंचशाखेहस्तेआर्तिः पीडास्यादित्यग्रिमस्थेनसंबंधः ॥ २७ ॥ तदनुशुक्रयुतेदशमस्थे शनौक्लीबोनपुंसकःस्यात् शुक्राक्रांतराशेः व्ययषष्ठगेशनौक्लीबरूपः रूपेणक्लीबसदृशः नतुक्लीबः सिंहराशिस्थश्चंद्रः सप्तमगंभौमंपश्येत्तदाकाणःस्यात् कर्कस्थःसूर्यः सप्तमगं-भौमंपश्येत्तदाकाणः उभययोगेऽपिकाणःस्यात् यदिनवमपः मेषसिंहवृश्चिकमकरेस्या दितिसंबंधः ॥ २८ ॥

अर्थ.—अष्टम व नवम स्थानाचे स्वामी, पापग्रहांपासून चतुर्थस्थानांत असून पापग्रहां-नीं युक्त असतील तर अथवा शनि मंगळ व राहु हे षष्ठस्थानांत किंवा शनि, मंगळ व रवि हे षष्ठस्थानांत असतील तर अथवा शनि व षष्ठस्थानाचा अधिपति द्वादशस्थानांत असून पापग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट असेल तर त्या मनुष्याच्या पोटऱ्या ठणकतील. रवि, चंद्र व शनि षष्ठ, अष्टम, द्वादश या स्थानांत असतील तर त्या मनुष्याचे हातास पीडा हो-ईल. दशमस्थानीं शनि व शुक्र असतील तर तो मनुष्य नपुंसक होतो. शुक्रापासून षष्ठ किं-वा द्वादश या स्थानांत शनि असेल तर क्लीबासारखा (नपुंसकाप्रमाणें) होतो. सिंह रा-शीस चंद्र असून तो सप्तमस्थानांत असलेल्या मंगळास पहात असेल तर किंवा कर्क-राशीस रवि असून सप्तमस्थानांतील मंगळास पाहील तर तो मनुष्य काणा होतो नवम-स्थानाचा स्वामी मेष, सिंह, वृश्चिक व मकर या राशींस असून सप्तमस्थानच्या मंगळास पहात असेल तर तो मनुष्य काणा होतो. २७।२८

नपुंसक योग.

अन्योऽन्यंपश्यतश्चेत्तरणिहिमकरौतत्तनूजौमिथोवा ॥
भूसूनुःपश्यतीनंसमभवनगतंत्वंगचंद्रौयदोजे ॥
ओजर्क्षेयुग्मराशौहिमकरशशिजौभूसुतेनेक्षितौचेत् ॥
पुंराशौलग्नशुक्रौतदनुहिमकरःक्लीबयोगाःषडेते ॥२९॥

टीका.—सूर्यचंद्रौओजर्क्षेयुग्मराशौइत्याकृष्यान्वयः अन्योऽन्यंपरस्परं पश्यतः ओजराशिगः सूर्यः समराशिगंचंद्रंपश्यति तादृशश्चंद्रश्चसूर्यंपश्यति अयमेकोयोगः

तत्तनुजौशनिबुधौ ओजसमराशिगौअन्योऽन्यंपश्यतः द्वितीयोयोगः समराशिगंसूर्यं-भौमः विषमराशिगइत्यर्थात् सिद्धंभौमंचसूर्यः अन्योऽन्यंपश्यतिइतितृतीयोयोगः लग्नचंद्रौविषमराशिगौ भौमेनअर्थात् समराशिगेनदृष्टौइतिचतुर्थोयोगः चंद्रबुधौक्रमेण विषमसमराशिगौभौमेनवीक्षितौपंचमोयोगः लग्नशुक्रौचंद्रश्चपुंराशौपुरुषग्रहराशिनवांशेस्थिताविति षष्ठोयोगः एतेषट्क्लीबयोगाज्ञेयाः तदुक्तं सारावल्यां अन्योऽन्यंरवि-चंद्रौविषमाविषमर्क्षगौनिरीक्षेते इंदुज रविपुत्रौ वा तथैव नपुंसकंकुरुते वक्रो विषमगतोर्कंसमगं चैवंपरस्परालोकात् विषमर्क्षेलग्नेंदूसमराशिगतः कुजोविलोकयति शशि शशिजौसमविषमेभौमेननिरीक्षितौभवतः ओजनवांशकसंस्थालग्नेंदुसितास्तथैवोक्ता-इति ॥ २९ ॥

अर्थ.—रवि व चंद्र हे समविषम राशीस (दोन्हीं एके ठिकाणीं नाहींत असे) असून परस्परांस पहात असतील तर. तसेच शनि व बुध हे समविषमराशीस असतील तर, तसेच सूर्य व मंगळ समविषमराशीस असतील तर. लग्न, चंद्र व मंगळ समविषम राशीस पहात असतील तर चंद्र, बुध व मंगळ हे परस्पर समविषम राशीस पहात असतील तर. पुंराशीस (पुरुष ग्रहांचे राशीस) किंवा नवमांशांत लग्न, शुक्र चंद्र हे परस्परांस पहात असतील तर तो पुरुष नपुंसक होतो. हे ६ योग आहेत हे द्वादश भावावर पाहावे.

वृषणवृद्धि योग.

आयुस्थानोपयातेधरणिसुतयुतेभार्गवेवातकोपात् ॥
काव्येभौमेनयुक्तेकुजभवनगतेभूमिजामुष्कवृद्धिः ॥
भौमर्क्षेकाव्यचंद्रौसुरपतिगुरुणासूर्यजेनाथदृष्टौ ॥
नूनंस्यान्मानवानांजनुषिकललजामुष्कवृद्धिर्नितांतं ३०

टीका.—भौमयुतेशुक्रेऽष्टमस्थेवातकोपान्मुष्कवृद्धिः वृषणवृद्धिःस्यात् भौमराशिगतेभौमयुते शुक्रेभूमिसंसर्गात् वातकोपजावृषणवृद्धिःस्यात् येषांमानवानांजन्मसमये भौमराशिस्थौशुक्रचंद्रौगुरुशनिदृष्टौ तेषांककललजाकललदोषजावृषणवृद्धिः अतिशयितास्यात् कललंशुक्रशोणितमिश्रीभावः ॥ ३० ॥

अर्थ.—अष्टमस्थानांत शुक्र व मंगळ असतील तर वायूच्या कोपा पासून वृषण मोठा होतो. शुक्र, स्वराशीच्या मंगळाशीं युक्त असेल तर पृथ्वीपासून (मांस वृद्धीनें) वृषण मोठा होतो. शुक्र व चंद्र हे मंगळ गृहीं असून गुरु व शनि यांनीं दृष्ट असतील तर कललापासून (मूत्र संचयानें) वृषण मोठा होतो.

अंगपीडा योग.

क्रूरैर्दृष्टेविलग्नेसुविकृतरदनश्चापगोमेषसंज्ञे ॥
खल्वाटःपापलग्नेधनुषिगवितथालोकितेक्रूरखेटैः ॥

धर्मार्थीत्यात्मजस्थायदिखलखचराबंधभाक्पूरुषःस्या ॥
देवंलग्नेक्रियेवाधनुषिगवितथारश्मिजंबंधनंनुः ॥ ३१ ॥

टीका.—धनुषि वृषे मेषे वा विलग्ने क्रूरैर्दृष्टे विकृतदशनः नंतरोगीस्यात् पापलग्नेपापैर्युक्तं पापलग्नं तस्मिन् यथा प्रागुक्त योगेनसांकर्यस्यात् तस्मात् क्रूरग्रहयुक्तेधनुषि वृषे वा लग्ने क्रूरदृष्टेखल्वाटः खलतिरोगीस्यात् नवम द्वितीय द्वादश पंचमस्थाः क्रूराश्चेत्तदाबंधभाक् पुरुषःस्यात् एवं मेषे धनुषि वृषे वा लग्ने क्रूराक्रांतेनुः पुरुषस्यरश्मिबंधनंस्यात् ॥ ३१ ॥

अर्थ.—धन, वृषभ व मेष हीं लग्नें तनुभवनीं असून त्यांवर क्रूरग्रहांची दृष्टि असेल तर तो मनुष्य दंतरोगी होईल. धन व वृषभ हीं लग्नें असून पापग्रहांनीं दृष्ट किंवा युक्त असतील त्या मनुष्यास टक्कल पडतें. नवम, द्वितीय, द्वादश व पंचम या स्थानांत पापग्रह असतील तर त्या मनुष्यास बंधन होईल. मेष, वृषभ व धन हीं लग्नें पापग्रहानें युक्त किंवा दृष्ट असतील तर त्या मनुष्याच्या मुस्क्या बांधल्या जातील. ग्रहबलानीं शिक्षा सांगावी.

तात्पर्य.

पापग्रहांचें लग्न पापग्रहांनीं युक्त किंवा दृष्ट (स्वस्वामी सोडून) असेल तरी ही दंतरोगी व खल्वाट होतो असें सांगावें.

अंगदुर्गंधि योग.

दुर्गंधिर्दानवेज्येशनिभवनगतेमानवोविग्रहेस्या ॥
द्वेष्याधीशेबुधर्क्षेतदनुमकरगेतद्वदत्राथकाव्ये ॥
केंद्रस्थेतेनयुक्स्यादथकविरविजौस्वीयिहद्दायुतौचेत् ॥
तद्वच्चंद्रेऽजयातेतनुसदनगतेचाननेस्याद्विगंधिः ॥३२॥

टीका.—शुक्रे शनिराशिस्थेजातो मानवोविग्रहेशरीरेदुर्गंधिःस्यात् षष्ठाधिपेमिथुन कन्यामकरगे तद्वद्विग्रहेदुर्गंधिः अथकाव्येशुक्रेबुधर्क्षे तेन बुधेन युक्ते केंद्रगेसति तद्वद्विग्रहेदुर्गंधिः अथशुक्रशनीस्वीयहद्दायुतौस्वत्रिंशांशगौचेत्तद्वद्विग्रहेदुर्गंधिः अत्रछंदोनुरोधात्त्रिंशांशोहद्दाशब्दे नोपलक्षितः मेषस्थे चंद्रे लग्नगतेदुर्गंधिःस्यात् ॥ ३२ ॥

